महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०२१

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मालाड जलायश टेकडी मार्ग ते कांदिवली लोखंडवाला संकुल दरम्यानच्या वन विभागाच्या हद्दीतील रस्त्याच्या कामाबाबत

(१) ५२४ (०२-०४-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पूर्व) (मुंबई) येथील मालाड जलाशय टेकडी मार्ग ते कांदिवली लोखंडवाला संकुल दरम्यानच्या उर्वरित ४२४ मीटर वन विभागाच्या हद्दीतील रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे बांधकाम वन विभागाच्या परवानगी अभावी प्रलंबित असल्याने या संदर्भात लोकप्रतिनिधींनी मा. नगरविकास मंत्री महोदयांना दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निश्चित किती कालावधीत सदर रस्त्याचे काम शासनाने पूर्ण करणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उक्त वन विभागाच्या हद्दीतील ४२४ मीटरचे प्रलंबित रस्त्याचे विकास काम शासनाने वन विभागाची परवानगी घेऊन सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२०) :

(१) सदर रस्त्याचे सर्वेक्षण करण्याकरिता दिनांक ०३.०२.२०२० रोजी लोकप्रतिनिधींचे पत्र प्राप्त झाले असल्याचे रस्त्याच्या ७५० मी. लांबीचे क्षेत्र वन विभागाच्या अधिपत्याखाली असल्यामुळे सदर रस्ता विकसित करण्याकरिता वन्य जीव संरक्षण कायदा १९७२, वन संवर्धन कायदा १९८० व पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

त्यानुसार आवश्यक त्या सर्व परवानग्या प्राप्त करण्याच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही सुरु असून, सदर परवानग्या प्राप्त झाल्यानंतर सदर रस्त्याच्या विकासाच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर कालावधी संदर्भातील अभिप्राय देणे शक्य होईल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) सदर रस्त्याचे रेखांकन, अंदाजपत्रक, आराखडा, योजना इत्यादी तयार करण्याकरिता नियुक्त सल्लागारामार्फत सदर रस्त्याचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून, त्यानुसार सदर रस्ता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रामध्ये अंदाजे ७५० मी. बाधित आहे व उर्वरित ८५० मी. रस्ता आप्पापाडा, क्रांतीनगर रहिवाशी झोपडपट्टी क्षेत्रामध्ये बाधित आहे.

सदर प्रकरणी मा. पालकमंत्री (मुंबई उपनगरेत्र यांच्या अधिपत्येखाली पार पडलेल्या आढावा बैठकीच्या अनुषंगाने दिनांक ३०.०९.२०२० रोजी झालेल्या चर्चेनुसार, वन्य जीव संरक्षण कायदा १९७२, वन संवर्धन कायदा १९८० व पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ मधील तरतुदीनुसार परवानगी मिळणे सोईस्कर होणेकामी वन विभागातील रस्ता उड्डाणपूल स्वरुपात बांधण्याचे सुचविण्यात आले.

त्यानुसार वन विभागातील रस्ता उड्डाणपुल स्वरुपात व आप्पापाडा, क्रांतीनगर रहिवाशी झोपडपट्टीमधून जाणारा रस्ता डांबरी स्वरुपात विकसित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबतचा नव्याने सुधारीत प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून, सदर विकास नियोजित रस्त्याचा आराखडा, अंदाजपत्रक व नकाशे बनविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने वन, वन्यजीव व पर्यावरणविषयक आवश्यक त्या सर्व परवानग्या प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन रितसर पध्दतीने निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हापरीषद शाळांना नगरपरिषदेत समाविष्ट करण्याबाबत

(२) १११० (०३-०४-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचे नगरपरिषदेत रुपांतर करतांना जिल्हापरिषदेच्या शाळांचा नगरपरिषदेत समावेश न झाल्याने सदर शाळांचा नगरपरिषदेत समावेश करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील सद्यस्थितीतील नगरपरिषद क्षेत्रातील जिल्हापरीषद शाळांचा नगरपरिषदेत समावेश करण्याच्या प्रक्रियेमध्ये ब्रम्हपुरी नगरपरिषदेची प्राधान्याने कार्यवाही सुरु झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर व नागभीड सह अन्य नगरपरिषद क्षेत्रातील जिल्हापरीषद शाळांना नगरपरिषदेत प्राधान्याने समावेश करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील नगरपरिषदेच्या क्षेत्रातील जिल्हापरिषदेच्या शाळांना नगरपरिषदेत प्राधान्याने समावेश करण्याच्या प्रक्रियेसह नगरपंचायती मधील शाळांना प्रक्रियेत सामावून घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचा सर्वसाधारण तपशिल काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१) शासनाच्या ग्राम विकास विभागाने दिनांक २५/७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका यांचे क्षेत्र वाढीमुळे या क्षेत्रात हस्तांतरीत होणाऱ्या जिल्हा परिषदांच्या शाळांमधील शिक्षकांच्या सेवा हस्तांतरीत करण्याची कार्यपद्धती विहित केली आहे.

• त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी नगरपरिषदेने दिनांक २६/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे अभिप्राय शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद चंद्रपूर यांना कळविले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) नगरपरिषद चिमूरमध्ये अशी प्रक्रिया सुरु करण्यात आली असून, उर्वरित नगरपरिषदांमध्ये अद्याप अशी प्रक्रिया सुरु करण्यात आली नाही, असे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी कळविले आहे. दरम्यान दिनांक २५/७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे संबंधीत नगरपरिषदांना शासन स्तरावरुन कळविण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

घाटकोपर (पूर्व) मुंबई मधील रमाबाई नगर आणि कामराज नगरात नवीन मलःनिस्सारण वाहिनी टाकण्याबाबत

(३) १८९५ (२१-०३-२०२०). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर (पूर्व) मधील रमाबाई नगर आणि कामराज नगर येथे २ लाखांहून अधिक वस्ती असून तेथे बरीच शौचालये आहेत परंतु येथे मलःनिस्सारण वाहिनीची कोणतीच सुविधा उपलब्ध नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी नवीन मलःनिस्सारण वाहिनी टाकण्यासंदर्भात यापूर्वी अभ्यास करण्यात आला असून त्याचे पूर्ण आराखडे व नकाशे हे मुंबई महानगरपालिकेने तयार केले होते परंतु त्यावर महानगरपालिकेकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार नवीन मलःनिस्सारण वाहिनी टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर ठिकाणी मलनि:सारण वाहिनीची सुविधा पुरविण्यासाठी यापूर्वी सर्वेक्षण करुन तांत्रिक सुसाध्यता तपासण्यात आली होती. तथापि तेथील प्रस्तावित विकास नियोजन रस्ते हे झोपड्यांमुळे अतिक्रमित असल्यामुळे, पूर्व द्रुतगती मार्गाच्या पूर्वेकडील सेवा रस्त्यावर २३५० मि.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी आणि ६०० मि.मी. व्यासाची वायूवाहिनी असल्यामुळे तसेच पश्चिमेकडील सेवा रस्त्यावर ३००० मि.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी असल्यामुळे सदर मुख्य मलनि:सारण वाहिनी टाकणे तुर्तास शक्य होऊ शकले नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये महानगरपालिकेने मंडई सुरु केली नसल्याबाबत

(४) १९४० (२१-०३-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये मंडईसाठी राखीव ठेवलेल्या जागांवर अद्यापपर्यंत महानगरपालिकेने मंडई सुरु केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंडईसाठी उपलब्ध जागांचा वाणिज्य वापर करण्यास प्रकल्पबाधितांसाठी देण्याची तरतूद असली तरी त्यांना मंडईमधील अनुज्ञेय व्यवसायच करण्याची अट आहे तसेच मालकी ऐवजी 'परवाना' तत्वावर गाळे देण्यात येत असल्यामुळे प्रकल्पबाधित सदर ठिकाणी गाळे घेत नसल्यामुळे या जागा रिकाम्या रहात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्या मंडईच्या देखभालीसाठी सुरक्षारक्षक नसल्याने रात्रीच्या वेळी काही समाज कंटक असामाजिक कृत्य करीत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर ठिकाणी मंडई ऐवजी आवश्यक अन्य कारणासाठी वापर करण्याबाबत शासन महानगरपालिकेला निर्देश देणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०१-२०२१) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांमध्ये बाधित होणाऱ्या अनिवासी प्रकल्पबाधितांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे समायोजना आरक्षणांतर्गत प्राप्त होणाऱ्या मंड्यांमध्ये प्रचलित धोरणानुसार पर्यायी अनिवासी गाळा/जागा देण्यात येते.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त एकूण ७,८५,६४७ वर्गफुट जागेपैकी ७,७२,४१३ वर्गफुट इतक्या जागेचे वाटप प्रकल्पबाधितांना करण्यात आले आहे. वाटप करण्यात आलेल्या जागेपैकी ४,९८,९४२ वर्गफुट जागेवर गाळेधारकांनी महानगरपालिकेचे अनुज्ञापत्रधारक म्हणून ताबा घेतला आहे. तसेच ताबा घेतलेल्या जागेवर गाळेधारक व्यवसाय करीत आहेत.

वाटप करण्यात आलेल्या एकूण २,५८,७४१ वर्गफुट जागेचा प्रकल्पबाधितांनी ताबा घेतलेला नाही. ताबा न घेतलेल्या व्यक्तींनी सात दिवसांमध्ये पैसे भरुन वाटप करण्यात आलेली जागा ताब्यात घ्यावी अन्यथा वाटप करण्यात आलेली जागा रद्द करण्यात येईल असे प्रकल्पबाधितांना कळविण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर समायोजन आरक्षणांतर्गत प्राप्त होणाऱ्या मंडईमध्ये गाळेधारकांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार अनुज्ञेय व्यवसाय करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर व्यक्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाजार विभागाचा परवानाधारक होतो.

सदर मंडईतील गाळे तळमजला, पहिला मजला व वरील मजले याठिकाणी उपलब्ध

असल्याने बरेच प्रकल्पबाधीत व्यक्ती तळमजला सोडून वरील मजल्यावर जागा घेण्यास इच्छुक नसल्याचे दिसून येते.

मात्र जी व्यक्ती मंडईमध्ये देण्यात येत असलेला पर्यायी गाळा स्विकारु इच्छित नाही त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २८.०१.२०१९ रोजीच परिपत्रकानुसार आर्थिक मोबदल्याचा पर्याय उपलब्ध आहे असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) समायोजन आरक्षणांतर्गत प्राप्त होणाऱ्या मंडईमध्ये देखभालीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरक्षारक्षक नियुक्त करण्यात येत नाहीत.

तथापि काही असामाजिक कृत्य आढळल्यास स्थानिक पोलीस स्थानकात तक्रार करुन त्यावर कारवाई करण्यात येते.

(४) व (५) विकास नियोजन नकाशानुसार मंडई आरक्षण असलेला भूभाग विकसित करतांना समायोजन आरक्षणांतर्गत प्राप्त होणाऱ्या मंड्यांचा वापर विकास नियोजन नियमावलीनुसार होणे आवश्यक आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

जळगांव शहरात व राज्यात फेरीवाला धोरण राबविण्याबाबत

(५) २१६९ (०३-०४-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव महानगरपालिकेने गर्दीच्या परिसरातील फेरीवाले हटविण्यासाठी मोहिम सुरु केली असता काही महिने गर्दीचा परिसर फेरीवाला मुक्त झाला मात्र काही महिन्यांनंतर पुन्हा फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याचे सन २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव शहरात व राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात फेरीवाला धोरणाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने चार वर्षांपूर्वी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगांव शहरात व राज्यात फेरीवाला धोरण आखण्यात येणार असल्याचे शासनाने जाहिर केले होते परंतू त्यांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, फेरीवाला धोरण राबविण्यात न येण्यामागील कारणे काय आहेत तसेच सदर धोरण केव्हापर्यंत राबविण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२०) : (१) होय,

ना-फेरीवाला क्षेत्रात अतिक्रमण धारक यांनी व्यवसायास प्रवेश केल्यास त्यांचेवर कार्यवाही करणेत आली असून त्यानंतरही आवश्यकतेनुसार कार्यवाही केली जात आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) केंद्र सरकारद्वारा १ मे, २०१४ रोजी पदपथ विक्रेते (उपजिविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम-२०१४ लागू केलेला आहे.

सदर अधिनियमातील कलम ३६ (१) नुसार महाराष्ट्र शासनाद्वारे महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ दिनांक ०३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. तद्नंतर कलम ३६(१) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाद्वारे पथविक्रेता विक्रेते (उपजिविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) (महाराष्ट्र), योजना २०१७ दिनांक ०९.०१.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. उपरोक्त अधिनियमानुसार महानगरपालिकांकडून कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली नगरपरिषदेमधील (जि.गडचिरोली) झोपडपट्ट्यांना कायमस्वरूपी पट्टे देण्याबाबत

(६) ३०६२ (१६-०३-२०२०). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली नगरपरिषदेमध्ये (जि.गडचिरोली) मागील २५ वर्षांपासून रामनगर,इंदिरानगर गोकुळनगर विवेकांनद नगर इत्यादि झोपडपट्ट्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या झोपडपट्ट्यांना रस्ते, वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य यासारख्या सर्व सोयी सुविधा मागील अनेक वर्षांपासून नगर परिषदेमार्फत पुरविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांना अजूनपर्यंत कायमस्वरूपी पट्टे देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१) होय हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) इंदिरानगर येथील २००० लोकसंख्या असलेल्या झोपडपट्टीखालील जागा ७/१२ उताऱ्यानुसार मोठ्या झाडाचे जंगल, अशी नोंद आहे. सदर जागा वन विभागाच्या ताब्यात असून त्यावरील अतिक्रमण नियमानुकूल करता येत नाही.

• गडचिरोली नगरपरिषदेअंतर्गत विवेकानंद नगर येथील १७०० लोकसंख्या असलेल्या झोपडपट्टीखालील जागा ७/१२ उताऱ्यानुसार ओलिताखाली, अशी नोंद आहे. तसेच रामनगर येथील १५०० लोकसंख्या असलेल्या झोपडपट्टीखालील जागा ७/१२ उताऱ्यानुसार ओलिताखाली, अशी नोंद आहे. सदरच्या क्षेत्रातील ओलिताचे निस्तार हक्क कमी करण्याची कार्यवाही अंतिम टप्यात आहे, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

• गोकूळनगर येथील ४००० लोकसंख्या असलेल्या झोपडपट्टीखालील जागा ७/१२ उताऱ्यानुसार महसूल विभागाच्या ताब्यातील झुडपी जंगल सरकार, अशी नोंद आहे. याबाबत निर्वनिकरणाची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

आमगांव (जि.गोंदिया) येथील ७ गावांनी आमगांव नगरपरिषदेमध्ये समाविष्ट होण्यासाठी दर्शविलेला विरोध

(७) ३३५१ (०५-०४-२०२०). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगांव (जि.गोंदिया) मध्ये ८ गावे समाविष्ट करुन आमगांव नगरपरिषद करण्यात आली परंतू त्यातील रिसामा, बनगांव, माल्ही,किंडगीपार,कुंभारटोली,बिरली,पदमपूर या गावांनी नगरपरिषद मध्ये समाविष्ठ होण्यासाठी विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, आमगाव नगरपरिषदेत समाविष्ट सात ग्रामपंचायतील हद्दीतील लोकांनी केलेल्या मागणीनुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१), (२) व (३) शासन अधिसूचना दिनांक २/८/२०१७ अन्वये शासनाने गोंदिया जिल्ह्यातील आमगांव, बनगांव, रिसामा, कुंभारटोली, पदमपूर, किंडगीपार, बिरसी व माल्ही या ग्रामपंचायतीचे एकत्रित आमगाव नगरपरिषद गठीत केली आहे.

• यासंदर्भात जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडून दिनांक १९/७/२०१६ रोजीच्या प्राप्त प्रस्तावानुसार बिरसी आणि माल्ही या ग्रामपंचायतीने आमगाव नगरपरिषद स्थापन करण्यास सहमती दर्शविलेली नाही, असे कळविले.

• यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ५९००/२०१७ दाखल केले होते. सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांनी दिनांक २/८/२०१७ रोजीची शासन अधिसूचना दिनांक २८/११/२०१७ रोजीच्या आदेशान्वये रद्द केली. सदर आदेशाविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका क्रमांक ३३५९०/२०१७ दाखल करण्यात आली असून यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे रिट याचिका क्रमांक ५९००/२०१७ मध्ये दिनांक २८/११/२०१७ रोजी दिलेल्या आदेशाला स्थगिती दिलेली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईमध्ये स्वाईन फ्लूची समस्या वाढली असल्याबाबत

(८) ४०११ (०५-०४-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात स्वाइन फ्लुमुळे २३९ जणांचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईमध्ये स्वाईन फ्लूची समस्या वाढलेली असून सन २०१९ मध्ये मुंबई शहरामध्ये ४५१ लोकांना स्वाइन फ्लूची बाधा होऊन ५ लोकांचा स्वाईन फ्लूमुळे मृत्यू झाल्याची बाब दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१९ यावर्षी वातावरणातील बदल आणि वर्षाच्या शेवटपर्यंत सुरु असलेल्या पावसामुळे स्वाईन फ्लूमध्ये वाढ झाली असल्याचे तज्ञांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनातर्फे कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२१) : (१) माहे जानेवारी २०२० मध्ये संपूर्ण राज्यभर स्वाईन फ्ल्यूमुळे एकही मृत्यू झाला नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने कळविले आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविल्यानुसार, हे खरे आहे.

(४) केंद्र शासन तथा राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत स्वाईन फ्ल्यू या आजारांच्या प्रतिबंधासाठी व नियंत्रणासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येत असल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

फ्ल्यू सदृष्य लक्षणे असलेल्या रुग्णांना १८६ मनपा दवाखाने, १६ उपनगरीय रुग्णालये, ५ वैद्यकीय महाविद्यालये आणि कस्तुरबा रुग्णालयात (२४ तासांच्या आत ताप कमी होत नसल्यास) ऑसेलटॅमीवीर कॅप्सूलने उपचार केला जातो.

सर्व खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना प्रशिक्षण देऊन त्यांना एच-१ एन-१ या आजाराच्या उपचाराबाबत मार्गदर्शक सूचना वितरित करण्यात आल्या आहेत.

इन्फ्लूएंझा लसीकरण: सार्वजनिक आरोग्य खात्याद्वारे अतिजोखमीच्या गटातील (मधुमेह व उच्च रक्तदाब असणाऱ्या व्यक्ती, गरोदर माता, डॉक्टर्स व इतर आरोग्य कर्मचारी) व्यक्तींना ऐच्छिक व मोफत स्वरुपात इन्फ्लूएंझा लसीकरण ४ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये, ८ उपनगरीय रुग्णालयांमध्ये, २८ प्रसूतीगृहामध्ये व ७ दवाखान्यांमध्ये देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मागाठाणे (मुंबई) येथील टाटा पॉवर हाऊस तसेच जय महाराष्ट्र नगर येथील संक्रमण शिबिरात वर्षानुवर्ष राहत असलेल्या कुटुंबांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी करण्याबाबत

(९) ४२९९ (२०-०३-२०२०). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागाठाणे (मुंबई) विधानसभा क्षेत्रातील टाटा पॉवर हाऊस तसेच जय महाराष्ट्र नगर येथील संक्रमण शिबिरात वर्षानुवर्ष राहत असलेल्या कुटुंबांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१२-०१-२०२१) : (१) व (२) होय,हे खरे आहे.

म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील अधिकृत, अपात्र, अनाधिकृत भाडेकरू /रहिवाशी यांना पुनर्विकसीत होणाऱ्या संक्रमण शिबीरांमध्ये गाळे वाटप करून त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत. गृहनिर्माण विभाग शासन नर्णय क्र.:संकीर्ण:१०१४/प्र.क.१०२(भाग -१)/दुवपु-२ दि.१३ सप्टेंबर २०१९ अन्वये निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुल नगरपरिषदेतील (जि. चंद्रपूर) रोजंदारी कर्मचा-यांना कायम करण्याबाबत

(१०) ४६७० (०५-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुल नगरपरिषद (जि. चंद्रपूर) कार्यालय अंतर्गत दिनांक १० मार्च, १९९३ पुर्वीपासून वर्ग-३ मध्ये वाहन चालक १, वर्ग-४ मध्ये शिपाई ५, सफाई मेठ २ सफाई मजूर २ असे एकूण १० कर्मचारी रोजंदारीवर कार्यरत आहेत या कर्मचा-यांना विशेष बाब म्हणून पदनिर्मीतीसह नगरपरिषदेच्या सेवेत नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी त्यांचे दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास च्या पत्रान्वये सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास वि.स.स., बल्लारपूर यांनी नगरविकास मंत्री यांना निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१) मुल नगरपरिषदेअंतर्गत दिनांक १०/३/१९९३ पूर्वीपासून रोजंदारीवर कार्यरत असलेल्या ७ कर्मचाऱ्यांना नियमित करण्यासाठी अधिसंख्य पदे निर्माण करणे तसेच त्यामधील २ कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक अर्हतामध्ये शिथिलता देण्यासाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्याकडून दिनांक १२/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रस्तावात कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता व आस्थापना खर्चाची अट शिथिल करण्याची बाब समाविष्ट आहे. त्यानुसार हा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर शहरामधील (जि.ठाणे) ५०० चौ.मी. पर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्याबाबत

(११) ४९७७ (०५-०४-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील (जि.ठाणे) ५०० चौरस फूटांच्या घरांना मुंबई महानगरपालिकाप्रमाणे मालमत्ता कर माफ करण्याची मागणी शिवसेना शहरप्रमुख यांच्याकडून आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर शहरामधील सन २०१० पूर्वीच्या घरांना मालमत्ता कर माफ करणे आणि शासनाकडून महानगरपालिकेला तुटीचा निधी अनुदान स्वरूपात देण्याची ही मागणी निवेदनात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मालमत्ता कर माफ करण्यासाठी शासनाच्या वतीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०१-२०२१) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर निवेदनात नमूद केल्याप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर उल्हानगर महानगरपालिका क्षेत्रातील सन २००५ पूर्वीच्या ५०० चौ. फुटापर्यंतच्या सर्व सरसकट अधिकृत रहिवासी मालमत्ताधारकांचा मालमत्ता कर माफ करण्यास उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेने मान्यता दिली आहे.

सदर प्रस्ताव विखंडनाकरिता आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडून प्राप्त झाला असून, सदर प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये कोरोना बाधितांवर उपचार करण्यासाठी रुग्णालयात उपलब्ध केलेल्या बेडची व सोयीसुविधांची व्यवस्था जाहीर करण्याबाबत

(१२) ११३८७ (१७-०९-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच मुंबई महानगरपालिकेत अतिवेगाने कोरोना चा संसर्ग पसरत चालला आहे तसेच सद्या मुंबईमध्ये हजारो रुग्ण कोरोनाबाधित सापडत आहेत. सदर रुग्ण उपचारासाठी रुग्णालयात गेले असता बेड उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे मुंबईतील नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून त्यांच्यात संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेतील किती रुग्णालयात कोरोना बाधितांवर उपचार करण्यासाठी कोणती व कशी व्यवस्था करण्यात आली आहे तसेच किती बेडची व्यवस्था केली

आहे याबाबतची माहिती मिळण्याकरिता आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना मा.लोकप्रतिनिधिंनी दिनांक ८ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (३०-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) कोविड-१९ बाधित रुग्णांसाठी पुरेशा खाटांची व्यवस्था करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गोरेगाव (मुंबई) नेस्को मैदानावरील कोरोना सेंटर उभारणीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(१३) ११५३२ (०६-०८-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरात कोरोनाचे मोठ्या प्रमाणात रूग्ण सापडत असताना शासनाने गोरेगावच्या नेस्को मैदानावर डीसीएचसी (डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर) उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेस्को मैदानावरील कोरोना सेंटर उभारणीमध्ये अनेक गैरव्यवहार निदर्शनास आले असून याच सेंटरसाठी ऑक्सिजन पुरविण्याचे कंत्राट हे एका विकासकाला (रोमेल ग्रुप) देण्यात आले असल्याचे दिनांक २७ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार दिसत असतांनासुद्धा ऑक्सिजनशिवाय आणखी दहा कोटींची कामेही याच विकासकाला देण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विकासकाला (रोमेल ग्रुप) ऑक्सिजनयुक्त खाटांसाठी ऑक्सिजनचा पुरवठा करण्याचा कोणताही अनुभव नसूनसुद्धा कंत्राट देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनातर्फे चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) नेस्को मैदानावरील कोरोना सेंटर उभारणीमध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नसून, मेसर्स

रोमेल ग्रुप यांना ऑक्सिजन सिलेंडर व त्याचे किट पुरवण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खाते यांच्या दराने देण्यात आले आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर कोरोना सेंटरमधील प्रत्येक रुग्णशय्येसोबत एक पंखा, रुग्णासाठी आवश्यक गादी, चादर, उशी, वैयक्तिक वापराचे इतर साहित्य यासह सदर कोरोना सेंटरसाठी लागणारे सर्व साहित्य, प्रत्येक बेडसोबत एक ऑक्सिजन सिलेंडर व त्याला पूरक अशी यंत्रणा पुरवणे या सर्व साहित्यांची देखभाल व परिरक्षण तसेच, सदर सेंटर बंद होईपर्यंत पुढील कालावधीत पुरवठादारामार्फत मोफत देखभाल व परिरक्षण या कामांचा पाणी पुरवठा व धुलाई खर्च वगळून एकूण रु. ८.४१ कोटी (जीएसटी वगळता) इतक्या रकमेचा कार्यादेश मेसर्स रोमेल रिॲल्टर्स यांना देण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) ऑक्सिजनयुक्त खाटांची तातडी पाहता, मेसर्स रोमेल रिॲल्टर्स यांना आयुक्तांच्या मान्यतेने सदर कामाचे कंत्राट देण्यात आले होते.

तसेच खाटा, ऑक्सिजन सिलेंडर व किटसहित नेस्को कोरोना सेंटर उभारणीचे काम त्या क्षेत्रातील कुशल कर्मचाऱ्यांकरवी यथायोग्य पूर्ण केले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्यामुळे चौकशी करण्यात आली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या २६ विभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्राच्या कर्मचाऱ्यांना मागील तीन महिन्यांपासून वेतन दिले नसल्याबाबत

(१४) ११७९७ (१७-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या २६ विभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्राच्या सुमारे १६० कर्मचाऱ्यांना मागील तीन महिन्यांपासून वेतन देण्यात आले नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याची बाब माहे जून, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणाकडे महानगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने सदर कर्मचाऱ्यांना त्यांच्या पगारापासून वंचित ठेवणारा ठेकेदार कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२१): (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २६ विभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रांमध्ये काम करणाऱ्या मे. अलंकित लि. यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना पगार दिला नसल्याबाबतच्या तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाल्या आहेत.

(२) व (३) नागरी सुविधा केंद्रामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पगार दिला नसल्याबाबतच्या तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाल्यानंतर सदर तक्रारी मे. अलंकित लि. च्या प्रोजेक्ट मॅनेजरला वेळोवेळी पाठवून ई-मेलद्वारे सतत पाठपुरावा केल्यानंतर, सदर कर्मचाऱ्यांना माहे मार्च, मे व जून, २०२० या महिन्यांचा पगार देण्यात आल्याचे तसेच, नागरी सुविधा केंद्र बंद असल्याने एप्रिल, २०२० या महिन्याचा पगार दिला नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेस ई-मेलद्वारे कळविण्यात आले आहे.

तथापि, सदर कर्मचाऱ्यांना जुलै, २०२० ते नोव्हेंबर, २०२० पर्यंत पगार दिल्याबाबत मे. अलंकित लि. यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस कोणतीही माहिती सादर केलेली नाही.

सदर प्रकरणी मे. अलंकित लि. यांना कारणे दाखवा नोटीसची बजावणी केल्यानंतर त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिलेले उत्तर समाधानकारक नसल्यामुळे त्यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

तथापि सदर कंपनीने दिनांक १ डिसेंबर, २०२० पासून अचानकपणे नागरी सुविधा केंद्रात सेवा देण्याचे थांबविल्यामुळे दिनांक २४ डिसेंबर, २०२० रोजी सदर कंपनीला कंत्राट करार रद्द झाल्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच सदर कंपनीने बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केलेली बँक गॅरंटी जप्त करुन ती वटविण्यात आली असून, सदर रक्कम महानगरपालिकेच्या खाती जमा करण्यात आली आहे.

तसेच, सदर कंपनी कर्मचाऱ्यांचा थकीत पगार देत नाही तोपर्यंत महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात असलेली त्यांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरीकरण दरम्यान वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

(१५) ११८०४ (१९-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरीकरण दरम्यान नांदगाव तिठा येथे पुलाचे अर्धवट काम पुन्हा एकदा सुरु झाले असल्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा प्रचंड सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम पूर्ण होईपर्यंत वाहतूक कोंडी होणार असल्याने त्याला पर्यायी रस्ता प्रशासनाने तयार केला आहे काय,

(३) नसल्यास, नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे होणारा त्रास लक्षात घेता पर्यायी रस्त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (११-१२-२०२०) : (१) हे खरे नाही. सदयस्थितीत मुंबई-गोवा महामार्गावरील 'नांदगाव तिठा' येथील भुयारी मार्गाचे (अंडरपासचे) बांधकाम पूर्ण झालेले असून जोडरस्त्यांच्या संरक्षक भिंतीचे काम प्रगतीत आहे. त्यामुळे वाहतूक नियंत्रित पध्दतीने सेवा रस्त्यावरुन सुरु आहे.

(२) व (३) सदयस्थितीत सदर ठिकाणच्या सेवा रस्त्यांचे काम पूर्ण झालेले असल्यामुळे पर्यायी रस्त्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंधेरी (मुंबई) येथे मे.मिलेनियर रियालिटी या विकासकाने नियमबाह्य बांधकाम केल्याबाबत

(१६) ११८४६ (०६-०८-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या के (पश्चिम) विभागातील अंधेरी सब वे, एस.व्ही. रोड येथे मे.मिलेनियर रियालिटी या विकासकाने सीटीएस क्रमांक ६५, ६६ ए, ६६ पीटी, १ ते ५ येथील नाल्याच्या दोन्ही बाजूने आरसीसी बांधकाम केल्याने व काही ठिकाणी नाला बंदिस्त केला असून पावसाळयात हा परिसर पाण्याचा निचरा न झाल्याने जलमय होवून तेथील नागरिकांचे जिवीताचे व मालमत्तेचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी नाल्याची रूंदी ६.५ मीटर करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेच्या अहवालात केवळ कागदोपत्री नमूद करण्यात आली असून विद्यमान अधिकाऱ्यांनी नाल्याची रूंदी सद्य:स्थितीत मोजणी करून ६.५ मीटर आहे असा अहवाल दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी विकासकाने बनावट कागदपत्रे तयार केल्याबाबत त्याच्यावर एमईसीआर क्रमांक ०४/२००९, दिनांक २२ डिसेंबर, २००९ रोजी वा त्या सुमारास डी.एन.नगर पोलीस स्थानक अंधेरी (पश्चिम) येथे गुन्हा दाखल झालेला असून विकासकाने नाल्याची रूंदी कमी करून महानगरपालिकेच्या तत्कालिन अधिकाऱ्यांसमवेत संगनमत करून नाल्यालगत अनधिकृत बांधकाम केल्याबाबत लाईफ इन लाईट या सामाजिक संस्थेने तसेच विधानसभा सदस्यांनी दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री व आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे तक्रारी सादर केल्या असून तत्कालिन आयुक्त श्री.प्रविण परदेशी यांनी दिनांक ४ जुलै, २०१९ रोजी वा त्या सुमारास स्थळ पाहणी करून या प्रकरणी तातडीने कारवाई करण्याचे आदेश देवूनही अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार अनधिकृत बांधकाम निष्कासित करून दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२), (३) ४) व (५) सदर भूभागातून वाहणाऱ्या नाल्याच्या ब्रिमस्टोवॅड अहवालातील प्रस्तावित ५ मी. रुंदीचे ३०% इतके अधिक रुंदीकरण प्रस्तावित करुन वास्तुविशारदाच्या विनंतीनुसार अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) यांच्या मंजुरीने अभिप्राय देऊन सदर नाला ६.५० मी. इतका रुंद तसेच सदर नाल्याची ६.५० मी. पेक्षा जास्त असलेली रुंदी कायम ठेवण्यात आली आहे.

तसेच सदर नाल्याचे बहुतांश काम पूर्ण झाल्यामुळे सदर नाल्याच्या कामाचे निरीक्षण करुन उप प्रमुख अभियंता (पजवा) यांनी दिलेल्या दिलेल अभिप्रायानुसार नाल्याची रुंदी ६.५० मी. व त्यापेक्षा जास्त असलेली ८.६० मी. इतकी रुंदी कायम ठेवली आहे.

याबाबत खातरजमा केल्यानंतर सदर नाल्याच्या पूर्ण झालेल्या कामास दिनांक १४.०६.२०१७

रोजी अंशत: पूर्णत्वाचा दाखला देण्यात आला आहे.

सदर प्रकरणी बनावट कागदपत्रे तयार केल्याबाबत संबंधितांविरुध्द दादाभाई नौरोजी नगर पोलीस ठाणे दिनांक २१.१२.२००९ रोजी एमईसीआर क्र. ०४/२००९ कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३८६, ५०६(२), ५११ सह १२०(ब) सह ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, महानगर दंडाधिकारी, १० वे न्यायालय, अंधेरी (पूर्व) येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सदर नाल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या तक्रारी व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी केलेल्या स्थळपाहणीच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेला सक्षम अधिकाऱ्यांनी अवलोकीत केल्यानंतर मा. विधानसभा सदस्यांना दिनांक ३०.०८.२०१९ व दिनांक ०७.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

खेड-शिवापूर (पुणे) टोलनाका स्थलांतरीत होण्याबाबत

(१७) ११९९५ (१८-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) वगळून मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड-शिवापूर (पुणे) येथील टोलनाक्यावर सातत्याने होणारी प्रचंड वाहतूक कोंडी, रस्त्यांची झालेली दुरवस्था व सर्व्हिस रस्त्याकडे केलेलं दुर्लक्ष याबबत अनेक वेळा नोटीसा/समज देऊन देखील राष्ट्रीय महामार्ग व संबधित टोल कंपनीकडून दुर्लक्षच करण्यात आल्याने स्थानिक नागरिकांसह महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांदेखील त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुणे, महामार्ग प्राधिकरणाने पाच तालुक्यासाठी टोलमाफीचे लेखी पत्र दिले असतानाही खेड-शिवापूर टोलनाका व्यवस्थापन अनधिकृतपणे टोलवसुली करीत असल्याने सर्व पक्षाचे लोकप्रतिनिधी, व्यावसायिक वाहन चालक संघटनेचे पदाधिकारी व कृती समिती यांच्या वतीने संबंधित प्रशासनाकडे बैठक घेऊन निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुसार सदर टोल संदर्भात समस्या सोडविण्यासाठी शासनाकडून कोणत्या स्वरुपाची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (०१-०१-२०२१) :(१) खेड-शिवापूर (पुणे) येथील टोलनाका केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना होणारी गैरसोय कमी करण्यासाठी भारत सरकारच्या निर्देशानुसार सदर टोलप्लाझावर फास्टटॅगव्दारे इलेक्ट्रॉनिक टोल संकलन सुरु करण्यात आले आहे. तसेच प्रवासकर्त्यांना फास्टटॅग सुविधेचा उपयोग करण्यास प्रोत्साहित केले जात आहे. जेणेकरुन टोल प्लाझावर कोणतीही गर्दी होणार नाही. सध्या दोन्ही बाजूंच्या फक्त १ लेनला हायब्रीड लेन (रोकड/इ.) म्हणून परवानगी आहे व उर्वरित १८ लेन खेड-शिवापूर टोल प्लाझा

येथे फास्टटॅग असलेल्या वाहनांसाठी आहेत. कधीकधी नॉन फास्टटॅग वाहने समर्पित फास्टॅग लेनमध्ये प्रवेश करतात, ज्यामुळे फास्टटॅग वाहनांची गैरसोय होते. शिवाय टोल प्लाझावर वाहतुकीची कोंडी होते.

मे २०२० च्या महिन्यात कोविड १९ (साथीचा रोग) साथीचा प्रसार होऊ नये म्हणून सरकारकडून निर्बंध/लॉकडाऊन परिस्थिती लागू केल्यामुळे महामार्ग किंवा खेड शिवापूर टोल प्लाझावर फारच कमी रहदारी होती.

सदर ठिकाणचा रस्ता वाहतुकीयोग्य ठेवण्याकरिता स्वतंत्र अभियंता तथा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत कंत्राटदार यांना वेळोवेळी सूचना देऊन नियमितपणे आवश्यक दुरुस्ती करण्यात येते, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(२) टोलमाफीबाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून कोणतेही पत्र निर्गमित करण्यात आलेले नाही.तथापी खेड-शिवापूर टोल प्लाझा हटाव कृती समितीच्या आंदोलनानंतर भोर, वेल्हा,मुलाशी,हवेली आणि पुरंदर या पाच तालुक्यांमधिल अव्यावसायिक वाहनांना टोल मधून सूट देण्यात येत असल्याबाबत कंत्राटदाराकडून दि.१६.०२.२०२० च्या पत्रान्वये कृती समितीला कळविले आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी निवेदन प्राप्त झाले आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी प्रस्तुत प्रकरणी पुढीलप्रमाणे माहिती कळविली आहे:-

अ) खेड-शिवापूर टोलनाक्यावर करण्यात येत असलेली टोलवसुली ही मंजूर अधिसुचनेनुसार/करारनाम्यानुसार करण्यात येत आहे.

ब) सदर टोलनाक्यावर सद्यस्थितीत फास्टटॅगद्वारे इलेक्ट्रॉनिक टोल संकलन सुरु करण्यात आले आहे. दि. १५.१२.२०१९ पूर्वी याचे प्रमाण २०% होते ते आता सुमारे ५०% ते ५५% पर्यंत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच फास्टटॅग सुविधेचा वापर करण्यासाठी प्रवाशांना आवाहन केले जात आहे.

क) पुणे दिशेकडे जाणा-या हलक्या वाहनांसाठी जादा टोल बूथ (५) बसविण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोना काळात खासगी रुग्णालयांकडून जादा दराची आकारणी होत असल्याबाबत

(१८) १२३१४ (१८-०९-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात शासनाने उपचारासाठी खासगी रुग्णालयांना दर निर्धारित केले असतानाही

खासगी रुग्णालयांकडून सर्वसामान्य रुग्णांची जादा दर आकारुन लूट केली जात असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील भाटिया रुग्णालयामध्ये छातीत दुखत असल्याच्या तक्रारीसाठी दाखल झालेल्या रुग्णाच्या कुटुंबीयांची संमती न घेता एन्जीओप्लास्टी करून ४ लाख ७० हजार रुपयांचे बिल आकारण्यात आल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकारे कुर्ला येथील खासगी रुग्णालयांमध्ये कोरोनाच्या वैद्यकीय उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या रुग्णाचे २१ दिवसांचे देयक साडेदहा लाख रुपयांच्या जवळपास करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार शासनाचे नियम धाब्यावर बसवून मुंबई येथील सर्वसामान्य रुग्णांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या खासगी रुग्णालयांवर शासन कोणती कारवाई करणार वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२१) : (१) कोरोना काळात शासनाने उपचारासाठी खासगी रुग्णालयांना दर निर्धारित केले असतानाही खासगी रुग्णालयांकडून सर्वसामान्य रुग्णांची जादा दर आकारुन लूट केली जात असल्याबाबतच्या तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागास प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) सदर रुग्णाच्या गंभीर स्थितीबाबत त्याच्या नातेवाईकांना माहिती देऊन ॲन्जीओप्लास्टी व पुढील उपचाराकरिता त्यांची मौखिक संमती घेण्यात आली होती.

तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लेखा परिक्षकांच्या तपासणीनंतर आकारण्यात आलेले रु. ४.७० लाख इतके बिल रु. १ लाखाने कमी करण्यात आले असून, उर्वरित रकमेचे पुढील तारखेचे १० धनादेश रुग्णाच्या नातेवाईकांकडून रुग्णालयात जमा करण्यात आले आहेत.

(३) कुर्ला येथील कोहिनूर हॉस्पिटल या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या एका रुग्णाचे ३५ दिवसांसाठीचे बिल रु. १२.९९ लाख इतके झाले होते.

सदर रुग्ण प्रथमत: २०% कोट्यांतर्गत दाखल करण्यात आला होता. तद्नंतर सदर रुग्णाच्या संबंधितांसोबत बिल काऊन्सिलिंग दरम्यान केलेल्या मागणीवरुन रुग्णालय प्रशासनाने सरकारी धोरणानुसार बिलाची आकारणी करुन अंतिम बिल रु. १२.९९ लाख इतके निर्धारित केले आहे. सदर बिलाचा भरणा रुग्णाने केला असून, त्यांनी याबाबत कोणतीही तक्रार केली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) रुग्णालयातील खाटांचे व्यवस्थापन तसेच नियमांनुसार शुल्काची आकारणी यासाठी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार खाजगी रुग्णालयामार्फत देयके आकारण्याबाबतच्या कार्यवाहीच्या निरीक्षणाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सनदी अधिकारी व महापालिकेच्या मुख्य लेखापरिक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील व महाराष्ट्रातील अनेक खाजगी नर्सिंग होम अवैधरित्या सुरु असल्याबाबत

(१९) १२४३९ (१९-०९-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व महाराष्ट्रातील हद्दीतील अनेक खाजगी नर्सिंग होमचे कामकाज महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी अधिनियम १९४९ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वैधानिक कायद्यांची तरतूद, नियम व तरतुदींचा भंग करून खाजगी नर्सिंग होम व हॉस्पिटल सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खासगी नर्सिंग होम व हॉस्पिटल हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अग्निशमन दल विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, नगररचना आणि इमारत व कारखाना विभाग यांच्याकडून अनिवार्य ना हरकत आणि परवानगी घेतल्याशिवाय बेकायदेशीररित्या कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नर्सिंग होम्सच्या व हॉस्पिटलच्या कामकाजासाठी आवश्यक असणारी खाजगी नर्सिंग होम किमान बेड आणि एमएनसी नर्सची आवश्यक संख्या राखण्यात अपयशी ठरली आहे तसेच काही खाजगी नर्सिंग होम बेकायदेशीर आणि अनधिकृत इमारतींमधून कार्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काही नर्सिंग होमनी आपापल्या नर्सिंग होममध्ये बेकायदेशीर बांधकाम केले आहे यात मोठ्या प्रमाणात अनियमिता आणि गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०१-२०२१) : (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत मुंबईतील खाजगी नर्सिंग होम्स/ रुग्णालयाची बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ अंतर्गत नोंदणी करण्यात येते.

तसेच, जागेच्या कागदपत्रांसह आवश्यक त्या सर्व निकषांची पूर्तता करीत असल्यास नर्सिंग होमची नोंदणी केली जाते.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत नर्सिंग होम्स आढळल्यास त्या नर्सिंग होमची महानगरपालिकेच्या विभागीय वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्यातर्फे पाहणी करुन संबंधित नर्सिंग होम्सला तपासणी अहवाल (IR) देण्यात येतो. सदर तपासणी अहवालात नमूद केलेल्या त्रुटींची पूर्तता झालेली नसल्यास गुन्हा (OS) दाखल करण्यात येतो.

मुंबई अग्निशमन दलामार्फत नर्सिंग होम/हॉस्पिटल इत्यादींची पाहणी करुन अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने अग्निसुरक्षिततेच्या अटी पूर्ततेसापेक्ष प्रमाणपत्र देण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत नर्सिंग होम/हॉस्पिटल यांची महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत यदृच्छेने

(Random) तपासणी करण्यात येते व अग्निसुरक्षा पुर्ततेमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या ठिकाणी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजा अधिनियम २००६ अतर्गत नोटीस देवून कारवाई करण्यात येते.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील जाहिरात कंपन्याकडून अनियमितता झाल्याबाबत

(२०) १२४६१ (२०-०९-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील जाहिरात कंपन्याकडून अनियमितता झाल्याने मा.जिल्हाधिकारी व मा.उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी जाहिरात कंपनीवर कारवाई करण्याबाबतचे किंवा सदर कंपन्याचे ठेके रद्द करण्याबाबतचे आदेश नगरपालिका प्रशासनाला दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार नगरपरिषद प्रशासनाने कोणकोणत्या जाहिरात कंपन्यावर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांच्यामार्फत चौकशी केली असून, त्यामध्ये "मे. श्रेया कन्स्ट्रक्शन" या जाहिरात संस्थेने निश्चित करुन दिलेल्या ठिकाणापेक्षा कमी ठिकाणी दिशादर्शक स्वागत कमानी, (गॅन्ट्रीज) कॅन्टी लिव्हर उभारले असल्याचे निदर्शनास आल्याने सदर संस्थेला दिलेले कंत्राट रद्द करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जोगेश्वरी (पूर्व) मुंबई रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या महानगरपालिकेच्या नवलकर मार्केटचा विकास करण्याबाबत

(२१) १२४७० (१९-०९-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी (पूर्व) रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या महानगरपालिकेचे नवलकर मार्केट सध्या अत्यंत अतिधोकादायक स्थितीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मंडईतील गाळेधारकांना महानगरपालिका प्रशासनाने मंडई रिक्त करण्यासंदर्भात पाठविलेल्या सुचनाची सध्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदर मंडईच्या नियोजित इमारतीचे आराखडेही वास्तुविशारदाकडून तयार असून हे काम लवकरात लवकर सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.आयुक्त व संबंधित अधिकारी यांच्याबरोबर संयुक्त बैठक घेतली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बैठकीत दिलेल्या सूचनांची दखल न घेण्यामागची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी या मंडईचा विकास हाँगकाँगच्या धर्तीवर करण्यासंदर्भात केलेल्या सूचनांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच किती कालावधीत सदर काम होणे अपेक्षित आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (३०-१२-२०२०) : (१) जोगेश्वरी (पूर्व) रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या महानगरपालिकेच्या नवलकर मंडईचे संरचनात्मक सल्लागार व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार समितीने दिलेल्या अहवालानुसार, मंडईच्या बैठ्या शेड्स धोकादायक घोषित करण्यात आल्या असून, मंडई रिक्त करुन तोडण्याचे अभिप्राय दिले आहेत.
(२) सदर मंडईतील अनुज्ञापत्रधारकांना मंडईतील गाळे रिक्त करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्यांना पर्यायी जागेवर स्थलांतरीत करण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या.

परंतु, अनुज्ञापत्रधारकांनी पर्यायी जागेवर स्थलांतरीत होण्यास तीव्र विरोध दर्शविला. दरम्यानच्या काळात मंडईच्या अत्यंत धोकादायक असलेल्या शेडची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती करण्यात आली असून, सद्य:स्थितीत अनुज्ञापत्रधारक सदर मंडईमध्ये व्यवसाय करीत आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) सदर बैठकीत दिलेल्या सूचनांची दखल घेऊन आराखडे बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) व (६) नागरिकांना जोगेश्वरी स्थानकातून थेट मंडईमध्ये खरेदीसाठी जाता यावे याकरिता जोगेश्वरी रेल्वे स्थानकातून येणारे पादचारी पूल मंडईच्या इमारतीच्या पहिल्या अथवा दुसऱ्या माळ्याशी जोडण्यात यावा असे सदर बैठकीदरम्यान सुचविण्यात आले होते.

तथापि, सदर पादचारी पूल हा मंडईच्या भूखंडाच्या पुढे उतरत असून, त्यामुळे सदर पूल मंडईच्या इमारतीस जोडता येणार नाही असे रेल्वेने कळविले.

त्यामुळे सदर मंडईच्या बाजूला रेल्वे लाईन असल्यामुळे व तेथे असलेल्या नाल्याच्या भिंतीचे काम करावयाचे असल्याने मोठी मोकळी जागा सोडून आराखडे बनविण्यात आले व जोत्याचे क्षेत्रफळ सद्य:स्थितीत असलेल्या अनुज्ञापत्रधारकांना सामावून घेण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षेत्रफळापुरतेच असल्याने रेल्वे पादचारी पूल मंडई इमारतीला जोडणे शक्य होणार नाही.

सदर बैठकीतील सूचनेप्रमाणे मडगांव (गोवा) येथील मासे मंडईप्रमाणे नवलकर मंडईतील मासळी विभागामध्ये अंतर्गत व्यवस्था करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच, सदर मंडईतील अनुज्ञापत्रधारकांना मंडईमध्येच तात्पुरते संक्रमण शिबिर बांधून देण्याचा निर्णय झाला असून, महापालिका वास्तुविशारद यांच्याकडे आराखडे बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, न.भू.क्र. २५५, २५६, २५७, २५८ व २५९ हे भूखंड महापालिका किरकोळ मंडईसाठी आरक्षित असून त्यापैकी न.भू.क्र. २५६, २५७ व २५८ हे भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावावर झाल्यानंतर मुख्य इमारतीचे आराखडे मंजुरीकरिता सादर करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

मुंबईतील भोईवाडा गाव वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत

(२२) १२५४० (१६-०७-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भोईवाडा गाव ही वसाहत मुंबई महानगरपालिकेची मालमत्ता असून या भूखंडावरील बैठ्या चाळीचा पुनर्विकास करण्याचे काम सन २००४ मध्ये सुरु करण्यात आले असून सन २००९ पर्यंत पूर्ण करावे अशी अट असतांनाही सन २०२० पर्यंत महानगरपालिकेने नेमलेल्या कंत्राटदाराने पुनर्विकासाचे काम पूर्ण केलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीमधील रहिवाशी गत अनेक वर्षांपासून संक्रमण शिबिरात राहत असून या संक्रमण शिबिरांचीही मोठ्या प्रमाणात दुरवस्था झालेली असल्यामुळे संक्रमण शिबिरात राहणा-या उक्त वसाहतीमधील रहिवाश्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००९ पर्यंत काम पूर्ण न केल्यास दर आठवड्यास ५ लाख २९ हजार रुपये दंड कंत्राटदारास लावण्याची तरतूद करारनाम्यात होती, त्यानुसार २२ कोटी रुपये दंड आकारण्यात आला असून उक्त दंडाची रक्कम कंत्राटदाराने महानगरपालिकेस अद्यापही अदा केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त पुनर्विकासाचे काम पूर्ण होऊन राहिवाश्यांना न्याय देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (३०-१२-२०२०) : (१) मुंबईतील भोईवाडा गाव या वसाहतीचा पुनर्विकास करण्याच्या प्रस्तावास स्थायी समितीच्या मंजुरीनंतर सदर कामासाठी निविदा प्रक्रियेतून मे. विघ्नहर्ता बिल्डर्स ॲण्ड प्रोजेक्टस प्रा.लि. यांची कंत्राटदार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार सदर कंत्राटदारास दिनांक २८.०३.२००३ अन्वये स्वीकृती पत्र देऊन पुनर्वसन इमारत क्र. १ च्या बांधकामास दिनांक ०१.०२.२००६ रोजी परवानगी दिली होती.

सदर कंत्राटातील अटी व शर्तीनुसार कंत्राट दिनांक ३१.०१.२०१० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. तसेच कंत्राट कालावधी संपल्यानंतरही दंडात्मक कार्यवाही करुन बांधकाम सुरु ठेवण्याची/पूर्ण करण्याची तरतूद सदर कंत्राटामध्ये होती.

तथापि दंडाची रक्कम वाढत असूनही कंत्राटदार काम करत नसल्यामुळे कंत्राटदारास "काम रद्द का करु नये" म्हणून "कारणे दाखवा" नोटीस बजावून कंत्राट आहे तशा परिस्थितीत थांबवून दिनांक २६.११.२०१५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर कंत्राटदाराची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.

सदर नियुक्ती रद्द करण्याच्या आदेशास कंत्राटदाराने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ७४० (एल)/२०१६ व कमर्शिअल सुट क्र. १९०/२०१६ अन्वये आव्हान दिले होते.

तसेच उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी मधल्या काळात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खुल्या निविदेद्वारे मे. किस्टोन रियल्टर्स डेव्हलपर्स प्रा.लि. यांची नियुक्ती करण्यात आली होती.

तथापि मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २१.०४.२०१६ व दिनांक २२.०८.२०१६ रोजीच्या

आदेशानुसार नवीन कंत्राटदार नियुक्तीसाठी स्थगिती आदेश देण्यात आले असून, सदर स्थगिती आदेश अद्यापि कायम आहेत.

तसेच, कमर्शिअल सुट क्रमांक १९०/२०१६ मधील नोटीस ऑफ मोशन क्र. ५३/२०१६ दिनांक १४.०९.२०१६ पासून सुनावणी तथा अंतिम निवाड्यासाठी प्रतिक्षाधीन असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ०७.११.२०१७ रोजी प्रेसिपी सादर करुन निवाड्याला गती देण्यासाठी मा. उच्च न्यायालयाला विनंती केली आहे.

तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व पक्षकारांचे युक्तीवाद दिनांक ०८.०७.२०१९ रोजी मा. उच्च न्यायालयात पूर्ण झाले असून, नोटीस ऑफ मोशनचा अंतिम निवाडा प्रतिक्षाधीन आहे.

(२) सदर संक्रमण शिबिरातील इमारतींचे स्थापत्य व विद्युत दुरुस्तीचे काम नियुक्त कंत्राटदार मे. किंजल कन्स्ट्रक्शन यांनी दिनांक ३०.०८.२०१८ रोजी समाधानकारकरित्या पूर्ण केले असून, सदर कामाचा दोष दायित्व कालावधी सर्वसाधारण (स्थापत्य व विद्युत) कामासांठी ३ वर्षे व संरचनात्मक व जलभेदीकरण कामासाठी ५ वर्षे इतका आहे.

तसेच, सदर इमारतीच्या दुरुस्तीबाबत रहिवाशांकडून प्राप्त तक्रारींचे निवारण संबंधित कंत्राटदाराकडून वेळोवेळी करुन घेण्यात येते. सद्य:स्थितीत सदर वसाहतीतील रहिवाशांची दुरुस्तीबाबतची कोणतीही तक्रार प्रलंबित नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४) व (५) कंत्राटदाराची नियुक्ती रद्द करण्याच्या आदेशास कंत्राटदाराने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ७४० (एल)/२०१६ व कमर्शिअल सुट क्र. १९०/२०१६ मध्ये दिनांक ०८.०७.२०१६ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान, निविदेतील अटी व शर्तीनुसार रु. २२ कोटी इतकी दंडाची रक्कम कंत्राटदाराने जमा करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाला आदेश पारित करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेली विनंती मा. न्यायालयाने अमान्य केली होती.

तथापि दंड आकारण्याची व नवीन कंत्राटदार नियुक्ती करण्याची बाब न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच वैधानिक प्रक्रियेमुळे उर्वरित काम पूर्ण करुन पुनर्वसन योजना राबविणे शक्य झाली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

मुंबईतील सर्व खाजगी रुग्णालयातील ८० टक्के खाटा करोना रुग्णांसाठी आरक्षित करणेसंबंधी निर्गमित केलेले आदेश

(२३) १२६०३ (१९-०९-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत करोना रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता रुग्णांना बेड उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने मुंबईतील सर्व खाजगी कोविड रुग्णालयातील २० टक्के खाटा ताब्यात घेण्याचा निर्णय दिनांक ५ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास घेतला तसेच रुग्णालयातील ८० टक्के खाटा करोना रुग्णांकरिता राखीव ठेवण्याबाबत शासनाने दिनांक २१मे, २०२० रोजी वा त्या सुमारास आदेश निर्गमित केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदेश निर्गमित केल्यानंतर - (माहे जुलै, २०२० अखेर) अद्यापपर्यंत मुंबई महानगरपालिकेने कोणत्या रुग्णालयातील ८० टक्के खाटा ताब्यात घेऊन करोना रुग्णांना उपलब्ध करुन दिल्या आहेत व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, शासनाने आयसीएमआरच्या मार्गदर्शक तत्त्वांचे मुंबईतील किती रुग्णालयांनी उल्लंघन केल्याचे आढळून आले आहे, अद्यापपर्यंत त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अद्याप किती खाजगी रुग्णालयांनी शासनास ८० टक्के खाटा ताब्यात दिल्या नसल्याचे आढळून आले आहे व शासन आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी शासनाने खाजगी रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१) होय हे खरे आहे.

(२) राज्य शासनाच्या दिनांक २१/०५/२०२० रोजीच्या शासन आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १०० खाजगी रुग्णालयातील ८० टक्के खाटा ताब्यात घेऊन कोरोना रुग्णांना जनरल बेड, आय सीयू बेड, कोविड आणि नॉन-कोविड बेड अशा स्वरुपात उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

(३) दिनांक ३०/०४/२०२० ते दिनांक २४/१०/२०२० पर्यंत खाजगी रुग्णालयांविरुद्ध एकुण ३३३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी २८० तक्रारी बंद करण्यात आल्या असून उर्वरित ५३ तक्रारींवर मुख्य लेखापरिक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

खाजगी रुग्णालयांविरुद्ध प्राप्त एकुण तक्रारी ३३३

रुग्णालयांकडून आकारण्यात आलेले एकूण देयक	१५.८७ कोटी
शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार सुधारित देयक	१३.२७ कोटी
तक्रारी प्राप्त झाल्यानंतर रुग्णांना देयकामध्ये दिलेली सवलत	१.४८ कोटी
तक्रारी प्राप्त झाल्यानंतर रुग्णांना परत केलेली देयकातील एकूण रक्कम	१.१२ कोटी

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरातील शिवाजीनगर भुयारी मार्गाचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत

(२४) १२८०१ (१९-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील शिवाजीनगर भुयारी मार्ग प्रमुख मार्ग असून अनेक वर्षांपासून भुयारी मार्गाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सतत होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे वाहतूकदार व नागरिकांना त्रासाला सामोरे जोवे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भुयारी मार्गाचे काम करण्यासाठी नागरिकांनी अनेकदा प्रशासनास निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने शिवाजीनगर भुयारी मार्गाचे रखडलेले काम लवकरात -लवकर पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१८-१२-२०२०) :(१) प्रश्नाधीन भुयारी मार्गाची मागणी असून त्यास अद्याप मंजुरी प्राप्त झालेली नाही.
(२) होय. हे खरे आहे.
(३) होय. हे खरे आहे.
(४) प्रश्नाधीन भुयारी मार्गासाठी ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सार्वजनिक बांधकाम विभाग व रेल्वे विभागामार्फत खर्च विभागणी (Cost Sharing) तत्वावर काम करण्याचे नियोजन आहे. त्याप्रमाणे प्रस्ताव रेल्वे विभागाकडे सादर केला असता सदर प्रस्ताव रेल्वे विभागाच्या वार्षिक कार्यक्रमात अंतर्भूत झाला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरातील छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती ते पिसादेवी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत

(२५) १२८०७ (१९-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरातील छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दररोज पहाटे पासूनच पंचक्रोशी मधून शेतीमाल विकण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणात येत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती ते पिसादेवी रस्त्याची दूरवस्था झाली असल्याने धूळ उडत असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती ते पिसादेवी रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
प्रश्नाधीन रस्त्याचे काम माहे ऑगस्ट, २०२० मध्ये पूर्ण झाले असून सद्यस्थितीत रस्त्यावर धुळ उडत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील गृहनिर्माण प्रकल्प आर्थिक मंदीमुळे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२६) १२८४८ (१९-०९-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील शेकडो प्रकल्पांनी रेरा नोंदणी केलेली आहे परंतु आर्थिक मंदीमुळे असे अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे अपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्याबाबत शासनाने काही धोरण निश्चित केले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१२-०१-२०२१) : (१) व (२) मुंबई शहरात एकूण ८२८ प्रकल्प महारेराकडे नोंदणीकृत असून त्यापैकी १४८ प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. ज्या प्रकल्पांची मुदत संपलेली आहे, अशा १७० प्रकल्पांना महारेरातर्फे रेरा कायद्यातील तरतुदींनुसार मुदतवाढ दिली आहे, अशा १७० प्रकल्पांना महारेरातर्फे रेरा कायद्यातील तरतुदीनुसार मुदतवाढ दिली आहे. उर्वरित प्रकल्प विविध कारणांमुळे अपुर्णवस्थेत आहेत. तसेच, अपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्याबाबत रेरा कायद्यातील कलम ७ व ८ मध्ये तरतुद आहे. यामध्ये प्रकल्पातील सर्व सभासद एकत्र येऊन महारेराकडे तक्रार दाखल करू शकतात व सदर तक्रारीवर सुनावणी घेऊन, योग्य तो निर्णय घेतला जातो.

(३) प्रश्न उभ्दवत नाहीस.

मुंबईतील न्यू पी एम जी पी म्हाडा कॉलनीच्या पुर्नविकास प्रकल्पाबाबत

(२७) १३०८९ (१९-०९-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा व खाजगी विकसक यांच्या संयुक्त उपक्रमानुसार न्यू पी एम जी पी कॉलनीचा पुर्नविकास प्रकल्प सुरू करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प पूर्ण होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे तसेच तेथील संक्रमण शिबिरही धोकादायक अवस्थेत असून सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१७-१२-२०२०) : (१) होय.

(२) सदरचा प्रकल्प संयुक्त करारनाम्याच्या अनुरोध व बांधकाम आरंभ जारी केल्यानंतर म्हणजेच दि.०१.०४.२०११ पासून ३६ महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित होते.

सदरहू प्रकल्पाच्या संक्रमण शिबीरातील विविध समस्यांबाबत रहिवाश्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुंबई मंडळाकडून दि.०६.१०.२०१८ रोजी संक्रमण शिबीराची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आलेली आहे. संक्रमण शिबीराची जबाबदारी विकासकाची असल्याने संक्रमण शिबीरामध्ये आवश्यक त्या दुरूस्ती करण्याकरीता विकासक मे. रिचा रिअल्टर्स यांना निर्देश

देण्यात आलेले आहे. न्यू.पी. एम.जी.पी वसाहतीचा पुनर्विकास लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने म्हाडाकडून वेळोवेळी संयुक्त बैठका आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच सदर विषयाबाबत शासन स्तरावर झालेल्या दि.११.०२.२०२० व दि.२५.०८.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये रखडलेला प्रकल्प त्वरीत चालू करण्याबाबत विकासकाला निर्देश देण्यात आले असून त्यांनी याबाबत सकारात्मक कार्यवाही न केल्यास म्हाडास नियमानुसार उचित कारवाई करण्याचे निर्देश मा.मंत्री महोदयांनी दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

करोनाची लक्षणे असली तरी मृत व्यक्तीची चाचणी न करण्याच्या नियमामुळे संसर्ग वाढत असल्याबाबत

(२८) १३२१४ (२०-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळीच्या बीडीडी चाळीत राहणारे आणि महाराष्ट्र पोलीस दलाच्या अंमली पदार्थविरोधी पथकात काम करणाऱ्या श्री.मंगेश कांबळे (४०) यांचा दिनांक २९ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास के. ई.एम. रुग्णालयात उपचार सुरु असतानाच मृत्यू झाला असतानाही नियमावर बोट ठेवत रुग्णालयाने त्यांची मृत्यूनंतर करोना चाचणी करण्यास नकार दिला असल्याची संतापजनक घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे राज्यात करोनाची लक्षणे असली तरी मृत व्यक्तीची चाचणी न करण्याच्या नियमामुळे संसर्ग प्रसाराचा धोका वाढत असल्याचे प्रकार समोर येत असून अशा प्रकारांमुळे मृतांचे कुटुंबीय, खासकरून अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांचे नातेवाईक शासनाकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०१-२०२१) : (१) श्री. मंगेश कांबळे, हवालदार यांना दिनांक २९.०६.२०२० रोजी के.ई.एम. रुग्णालयातील आपत्कालीन विभागात आणल्यानंतर त्यांच्यावर ई.सी.जी. द्वारे तात्काळ निदान व उपचार चालू करण्यात आले. तद्नंतर अवघ्या ४८ मिनिटांत त्यांचा मृत्यू ओढवला. त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने ओढवला असल्याचे ई.सी.जी. द्वारे लक्षात आले.

सदर घटनाक्रमानुसार त्यांचा मृत्यू नैसर्गिक ठरविण्यात आला.

तथापि मंगेश कांबळे यांच्या नातेवाईकांकडे चौकशी केली असता, त्यांना कोणत्याही प्रकारचा ताप, खोकला, दम लागणे यापैकी कोविड संबंधित कोणतीही लक्षणे नव्हती.

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार मृतकाची कोविड चाचणी करण्यात येत नाही. त्यामुळे श्री. मंगेश कांबळे यांच्या मृतकाची कोविड चाचणी त्यावेळी करण्यात आली नाही.

(२) कोरोना चाचणी ही शासन निर्णयानुसार करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मानोरा-दिग्रस रस्त्यावरील बेलोरा (ता.मानोरा,जि.वाशिम) गावाजवळील पूल वाहून गेल्याबाबत

(२९) १३३४५ (१९-०९-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानोरा-दिग्रस रस्त्यावरील सुरू असलेल्या रस्त्याच्या बांधकामामुळे नागरिकांकरीता पर्यायी व्यवस्था म्हणून बांधण्यात आलेला बेलोरा (ता.मानोरा,जि. वाशिम) गावाजवळील पूल दिनांक ३ जुलै २०२० रोजी वा त्या सुमारास मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसात वाहून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरु असलेले सदर रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असून पर्यायी व्यवस्था म्हणून बांधण्यात आलेला पूल त्यामुळेच वाहून गेला असल्याबाबतची तक्रार गावातील लोकांनी संबंधीत विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधीत विभागाद्वारे पर्यायी व्यवस्थेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, तसेच सदर रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार संबंधीत दोषी ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (११-१२-२०२०) : (१) हे अंशतः खरे आहे.

मानोरा दिग्रस रस्त्यावरील साखळी क्र. ४४/४२२ मधील नवीन पूलाचे बांधकामासाठी तयार करण्यात आलेला तात्पुरता वळण मार्ग अतिवृष्टीमुळे पाण्याखाली गेल्याने क्षतिग्रस्त झाला होता.

(२) हे खरे नाही.सदर रस्त्याचे व पूलाचे बांधकाम IRC मानकाप्रमाणे करण्यात येत आहे.

(३) क्षतिग्रस्त झालेल्या वळण मार्गाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आले असून त्यावरून वाहतूक पुनर्प्रस्थापित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांची क्षमता ४० हजार खाटांची असूनही करोना बाधितांवर उपचार करण्यासाठी फक्त ४ हजार खाटा उपलब्ध करुन देण्यात आल्याबाबत

(३०) १३३८२ (२०-०९-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांची क्षमता ४० हजार खाटांची असूनही महानगरपालिका प्रशासनाने याकरिता करोनाबाधितांवर उपचार करण्यासाठी ४ हजार खाटा उपलब्ध करुन दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १०.५.२०२० रोजी वा त्या सुमारास मुंबईतील करोना बाधितांची संख्या १२ हजार ७०० इतकी झाली असल्यामुळे उर्वरीत ८ हजार करोना रुग्णांना उपचारासाठी खाटा व डॉक्टर उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने अद्याप कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुंबईत करोनाग्रस्तांची सातत्याने वाढती संख्या विचारात घेता शासनामार्फत मुंबई महानगरपालिकेने अद्यापपर्यंत केलेली उपाययोजना व कार्यवाहीबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.

आवश्यकतेनुसार विविध रुग्णालयांमधील खाटांची संख्या वाढवण्यात आली.

(२) कोविड-१९ रुग्णांकरिता Covid Care Centre (CCC१), Covid Care Centre (CCC२), Dedicated Covid Health Centre (DCHC) व Dedicated Covid Hospital (DCH) केंद्र स्थापन केलेली आहेत. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील केंद्रांची संख्या व खाटांची संख्या खालीलप्रमाणे आहे :-

अ. क्र.	केंद्राचा प्रकार	केंद्राची संख्या	खाटांची संख्या
१	CCC१	३३६	४६७१२
२	CCC२	१८१	२३८०६
३	DCHC	३७	९१६४
४	DCH	८०	९७९७
एकुण	..	६३४	८९४७९

(३) मुंबईत कोविडग्रस्तांची संख्या विचारात घेता, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे लोकमान्य टिळक रुग्णालय, कूपर रुग्णालय, नायर रुग्णालय, रा.ए.स्मा. रुग्णालय, सायन रुग्णालय या ठिकाणी आवश्यकतेनुसार कोविड रुग्णांकरिता खाटा, साधारण कक्ष, विशेष अतिदक्षता विभाग, अलगिकरण कक्ष, इत्यादींची व्यवस्था करण्यात आली आहे.

कोविड-१९ रुग्णांकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्रिस्तरीय उपाययोजना केलेली आहे. त्यानुसार, संशयित कोविड रुग्ण, अति जोखमीच्या तसेच कोविड रुग्णांच्या संपर्कात येणाऱ्या जवळिल व्यक्तिंकरिता CCC१ केंद्र प्रत्येक विभागात कार्यरत आहेत. कोविड-१९ रुग्णांकरिता ६४ CCC२, ३७ DCHC व ८० DCH केंद्र स्थापन केली होती. सद्यस्थितीत २७ CCC२, २८ DCHC व ७३ DCH केंद्र कार्यरत आहेत.

तसेच, रिचर्डसन आणि क्रुडास भायखळा व मुलुंड, NSCI वरळी (I & II), बीकेसी वांद्रे (I & II), नेस्को गोरेगाव, नेस्को आयसीयु, दहिसर चेक नाका आणि कांदरपाडा आयसीयु येथे सुसज्ज JUMBO facilities कार्यरत आहेत. रुग्णांच्या उपचाराकरिता आवश्यकतेनुसार खाटा व कक्षांची निर्मिती करण्यात आली आहे.

कोविडबाधित रुग्णांवर उपचार करण्यासाठी अतिरिक्त डॉक्टर्स, नर्सेस तसेच कामगार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच आवश्यक असणारे वैद्यकीय उपकरणे आणि फर्निचर यांची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. रुग्णांकरिता डिस्पोजेबल बेडशिट्स, प्रथिनयुक्त आहार, औषधे, इ. सुविधा विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. कोरोनाबाधित रुग्णांची वैद्यकीय तपासणी व उपचार हे विहीत निकषानुसार करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील अंधेरी -घाटकोपर या जोड रस्त्याच्या कामाबाबत

(३१) १३५४४ (२०-०९-२०२०). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी घाटकोपर जोड मार्ग (लींक रोड) हा पूर्व पश्चिम उपनगरांना जोडणारा जोड रस्ता असून या जोड रस्त्याचे काम जवळपास पंधरा वर्षापासून अत्यंत संथ गतीने सुरू असून ते अद्यापि अपूर्णावस्थेत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपूल अत्यंत अरुंद असल्याने प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत असून या उड्डाणपुलाचे रुंदीकरण करताना ते १५० फूट बनविण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलाचे रुंदीकरण करताना काही उपयुक्त जलवाहिन्यांचेही स्थलांतर करण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पुलाचे पंधरा वर्षापासून संथ गतीने सुरू असलेले काम तातडीने पूर्ण करण्याबाबत व उड्डाणपुलाचे रुंदीकरण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२) अंधेरी-घाटकोपर जोडमार्गामध्ये रेल्वेवर असलेला पूल हा अरुंद असून, सदर पुलाची पुनर्बांधणी प्रस्तावित १५० फुट आर.एल. प्रमाणे प्राधान्याने करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) अंधेरी-घाटकोपर जोडमार्गावरील सदर पुलाच्या पूर्वेकडील भाग तसेच पश्चिमेकडील भागाचा पाणी पुरवठा स्वतंत्र जलवितरण व्यवस्थेमार्फत करण्यात येत असल्याने, पुलावरुन जात असलेल्या १५० मि.मी. व २५० मि.मी. व्यासाच्या जलवाहिन्या जुलै, २०१८ मध्ये पुलावरील भारमान कमी करण्याच्या उद्देशाने खंडीत करण्यात आल्या असून, सद्य:स्थितीत सदर पुलावर कोणतीही जलवाहिनी अस्तित्वात नाही.

(४) व (५) मुंबईतील अंधेरी-घाटकोपर जोड मार्ग हा रस्ता सन २०१५ मध्ये "जैसे थे" स्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आला.

सदर जोडमार्ग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व, "एल" विभाग आणि "एन" विभागातून जात असून, सदर जोडमार्गाच्या अंधेरी विभागातील (के/पूर्व) ३.४ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले असून, उर्वरित रस्त्याचे व सदर रस्त्यावर मलनि:सारण वाहिनी टाकण्याची कामे सुरु असून, सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

उर्वरित उपलब्ध असलेल्या रस्त्यावरुन वाहतुक सुरळीत सुरु आहे. तसेच सदर रस्त्याचे "एल" विभागातील काम दिनांक १०.०६.२०१९ रोजी पूर्ण झाले असून, "एन" विभागातील रस्ता रुंदीकरण कामाचा कालावधी एप्रिल, २०२० पर्यंत होता. परंतु कोविड-१९ च्या लॉकडाऊनमुळे सदर कामाचा कालावधी दिनांक ३१.१२.२०२० पर्यंत वाढविण्यात आला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

घाटकोपर (पूर्व) मधील रायझिंग सिटी या संकुलामध्ये संयुक्त स्मशानभूमीच्या कामाबाबत

(३२) १३५४९ (२०-०९-२०२०). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील घाटकोपर (पूर्व) मधील कामराज नगर वस्तीच्या मागे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या रायझिंग सिटी या संकुलामध्ये संयुक्त स्मशानभूमीचे आरक्षित असलेल्या प्लॉट आता महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आरक्षित जागेवर केवळ मुस्लिम कब्रस्तानचे बांधकाम केले असून ते मागील पाचवर्षांपूर्वी करण्यात आले व त्या शेजारील मोकळ्या जागेवर हिंदू व दलितांसाठी स्मशानभूमीचे काम अद्याप महानगरपालिकेने हाती घेतले नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्मशानभूमी नसल्याने स्थानिक नागरिकांना घाटकोपर येथे जवळपास वीस किमी अंतर चालत यावे लागत असून पूर्व द्रुतगती महामार्ग सारखा रस्ता ओलांडून जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संयुक्त आरक्षित असलेल्या जागेवर हिंदू व दलितांसाठीच्या स्मशानभूमीचे काम लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) सदर आरक्षित जागेवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नाही. तसेच हस्तांतरीत झालेली जागा १० वर्षांहून अधिक काळापासनू मुस्लीम समाजाकडून दफनभूमी म्हणून वापरात आहे.

तथापि हिंदू व दलितांकरिता स्मशानभूमीसाठी लगतची जागा मिळविण्याचा प्रस्ताव प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे नाही.

कामराज नगर येथे स्थानिक नागरिकांना अंत्यविधीकरिता जवळील घाटकोपर हिंदू सभा स्मशानभूमी २ कि.मी. अंतरावर उपलब्ध आहे.

(४) व (५) संमिश्र स्मशानभूमीच्या भूखंडालगत "उद्यान" या सार्वजनिक उद्दिष्टासाठी नामनिर्देशित असलेल्या भूखंडापैकी अंदाजे ५००० चौ.मी. क्षेत्रफळाच्या क्षेत्राचे नामनिर्देशन बदलून तो अतिरिक्त स्मशानभूमीकरिता संपादित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये विकास आराखड्यामध्ये फेरबदलाच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त करुन सदर भूखंडाच्या भूसंपादनाची/हस्तांतरणाची कार्यवाही सुरु करता येईल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

मुंबई पोर्ट ट्रस्टमधील वसाहतींना मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंत्यांकडून बेकायदेशीररित्या पाणी वितरण करण्यात येत असल्याबाबत

(३३) १३६६६ (२०-०९-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोर्ट ट्रस्ट परिसरातील ६ बंदरामध्ये लागणाऱ्या बोटी धुण्यासाठी दररोज १० लाख लिटर पाणी तर मुंबई पोर्ट ट्रस्टमधील काही वसाहतींना मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंत्यांकडून गेल्या १७ वर्षांपासून प्रतिदिन ३ लाख ६० हजार लीटर पाणी बेकायदेशीररित्या दिले जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाणीचोरीमुळे महानगरपालिकेचा कोटयवधी रूपयांचा महसूल मागील १७ वर्षांपासून बुडाल्याचा आरोप करून अशा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी महानगरपालिका सभागृहात माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली असता संबंधित अधिकाऱ्यांची केवळ पदोन्नती रोखण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेकडून व्यावसायिक कारणासाठी वापरण्यात येणाऱ्या १ हजार लिटर पाण्याकरिता ४० रूपये दर आकारण्यात येत असताना महानगरपालिकेचे अधिकाऱ्यांकडून सदरहू बंदरातील बोटीच्या मालकांना बेकायदेशीररित्या पाणी उपलब्ध करून देवून त्यापोटी १ हजार लिटर पाण्याकरिता ४५० रूपये दर आकारण्यात येत होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी बेकायदेशीररित्या पाणी वितरण करून कोटयवधी रूपयांची वसुली करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांकडून पैशांची वसुली करण्यात आली आहे काय, त्याचा तपशील काय आहे,

(५) असल्यास, सदरहू रक्कम संबंधितांकडून किती कालावधीत वसूल करण्यात येणार आहे तसेच सदरहू बेकायदेशीर पाणी वितरणास जबाबदार असणारे महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच शासनाच्या कोटयवधी रूपयांच्या महसुलाचे नुकसान करणाऱ्या या दोषी अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१): (१) व (२) पाणी चोरीमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कोट्यवधी रुपयांचा महसूल मागील १७ वर्षांपासून बुडाल्याचा आरोप करुन अशा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी दिनांक ०७.०१.२०२० रोजी झालेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महापालिका सभागृहात करण्यात आली होती व संबंधित अधिकाऱ्यांची पदोन्नती रोखण्यात आली होती हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

तथापि, शिवडी ते डॉकयार्ड परिसरात पाणी वाटपातील अनियमिततेबाबत चर्चा झालेल्या उप जल अभियंता (स्थापत्य) यांचा सदर प्रकरणाशी कोणत्याही स्तरावर प्रत्यक्ष संबंध येत नाही. यास्तव अनधिकृत पाणी पुरवठा केल्याची कोणतीही बाब त्यांच्याबाबतीत दिसून येत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर बांधकाम विभागातील गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

(३४) १३६६८ (१९-०९-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्त्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त स्वतंत्र अभियंता नियुक्त करून अभियंत्यांच्या अहवालानंतरच ठेकेदाराला देयके अदा करावीत असे बंधनकारक असताना अहमदनगर बांधकाम विभागाने कोट्यवधीची देयके केवळ कार्यकारी अभियंत्याच्या आदेशावरून अदा केल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी एकूण किती रक्कमेची बिले कोणकोणत्या ठेकेदाराकडून सादर करण्यात आली असून त्यापैकी किती ठेकेदारांची किती रक्कमेची देयके कार्यकारी अभियंत्यांच्या आदेशान्वये केव्हा-केव्हा अदा करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, तसेच ज्या कामांची देयके ठेकेदारांना अदा करण्यात आली आहेत त्यापैकी किती कामे पूर्ण झालेली आहेत व त्या सर्व कामांची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (१८-१२-२०२०) :(१) होय. हे खरे आहे. तथापि, हायब्रीड ॲन्युटी मॉड्युल (HAM) कार्यक्रमांतर्गत मंजुर असलेल्या प्रश्नांकित कामांवर निविदा शर्तीनुसार स्वतंत्र अभियंता यांची नियुक्ती होईपर्यंत कार्यकारी अभियंता यांनी स्वतंत्र अभियंता म्हणून काम पाहिले आहे.

(२) पॅकेज क्र. NSK ६९ मध्ये मे.राजपथ इन्फ्रॉकॉन लि.पुणे यांना पहिल्या माईलस्टोनचे रू. १७.९२ कोटीचे देयक दि.२८.०२.२०१९ रोजी व दुस-या माईलस्टोनचे रू. १८.०३ कोटीचे देयक दि.१४.०५.२०१९ रोजी अदा करण्यात आले आहे. पॅकेज क्र. NSK ७० (अ) व NSK ७० (ब) मध्ये कंत्राटदारास कोणत्याही प्रकारची देयके स्वतंत्र अभियंता न नेमता अदा करण्यात आलेले नाही.

(३) सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दौंड तालुक्यातील (जि. पुणे) पुणे-सोलापूर महामार्गावरील यवत व भांडगाव या ठिकाणी प्रस्तावित करण्यात आलेल्या भुयारी मार्गाबाबत

(३५) १३८०४ (१९-०९-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) वगळून मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यातील (जि. पुणे) पुणे-सोलापूर महामार्गावरील यवत व भांडगाव या ठिकाणी भुयारी मार्ग प्रस्तावित करण्यात आलेला असून यासाठी जागा सुचविण्याची विनंती राष्ट्रीय

राजमार्ग प्राधिकरणाकडून यवत व भांडगाव ग्रामपंचायतीला दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुयारी मार्ग करण्याबाबत शासनस्तरावर अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (११-१२-२०२०) : (१) प्रस्तुत बाब केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येते. सदर प्रकरणी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून ग्रामपंचायतीकडे विनंती करण्यात आली नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२) व (३) प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांचेकडून यवत व भांडगाव येथील प्रस्तावित भुयारी मार्गाबाबत पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे.

यवत: सदर महामार्गावरील मंजूर करारनाम्यामध्ये ६ X ३.५ मी. भुयारी मार्गाची तरतूद कि.मी. ४३ / ३७० येथे होती. परंतु तत्कालीन माननीय आमदार दौंड यांनी केलेल्या मागणीनुसार डाव्या बाजूकडील यवत शहर हायस्कूल व उजव्या बाजूकडील पोलीस स्टेशन विचारात घेवून सदर भुयारी मार्ग कि.मी. ४३ /८९० येथे म्हणजे ५२० मी. पुढे स्थानांतरित करण्यात आला आहे. तसेच सदर महामार्गावरील लोकल वाहतुकीचे विभाजन करण्यासाठी यवत शहरातील दोन्ही बाजूंनी सर्व्हिस रोड आहेत.

भांडगाव: सदर महामार्गावरील मंजूर करारनाम्यामध्ये भांडगाव जवळ ६ X ३.५ मी. भुयारी मार्गाची तरतूद कि.मी. ४७ / ६५० येथे होती. तथापि स्थानिक लोकप्रतिनिधी तत्कालीन माननीय आमदार, दौंड व संबंधित ग्रामपंचायतीच्या विरोधामुळे हे बांधकाम होऊ शकले नाही.

तथापि, सद्यस्थितीत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून पुणे-विजयवाडा सहापदरीकरणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या डीपीआर सल्लागारास सदर मागणीच्या योग्यतेचा विचार करण्यासाठी आणि प्रस्तावित डीपीआर तयार करताना सदर बाबत योग्य ती तरतूद करण्याची विनंती करण्यात आली आहे

खेरवाडी, बांद्रा (पूर्व) मुंबई येथील सिग्नलजवळ उभारलेल्या अनधिकृत कचरा चौकीबाबत

(३६) १३८३१ (२०-०९-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेरवाडी, वांद्रे (पूर्व) सिग्नलजवळ महसूल विभागाच्या जमिनीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेने कचरा गोळा करण्यासाठी अनधिकृत चौकी उभारली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकीजवळ कचरा गोळा करणाऱ्या वाहनांमुळे आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांना कच-याच्या दुर्गंधीमुळे हवा प्रदुषित होऊन श्वसनांचे विविध विकार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकीजवळ पडणाऱ्या कचऱ्यामुळे या परिसरात मोकाट भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला आहे त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित विभागाने सदर अनधिकृत चौकीसंबंधात कोणती कार्यवाही केली आहे व होणाऱ्या प्रदूषणाबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२१) : (१) खेरवाडी, वांद्रे (पूर्व) सिग्नलजवळ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाची चौकी आहे.

सदर चौकीचा मालमत्ता लेखा क्रमांक HE२१०५८७०३१००००० असा असून, दिनांक ०१.०४.१९८० पासून मालमत्ता कर निर्धारित करण्यात आला आहे.

तसेच सदर चौकी स्थानिक नागरिकांच्या सुविधेसाठी गेल्या ४० ते ५० वर्षांपासून वापरात असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३), (४) व (५) सदर ठिकाणी येणारी वाहने कामाची विभागणी केल्यानंतर ते तात्काळ कर्तव्यावर निघून जातात. तसेच सदर चौकीवर येणाऱ्या कचरा गाड्या बंदिस्त स्वरुपात असल्याने प्रदुषण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच, सदर चौकीच्या ठिकाणी नियमित साफसफाई राखली जात असल्यामुळे मोकाट कुत्र्यांचा प्रश्न उद्भवत नाही असे महानगरपालिकेने कळविले आहे.

घाटकोपर (मुंबई) येथील लक्ष्मीबाग नाल्यामध्ये पडून बालकाचा झालेला मृत्यु

(३७) १३८९१ (२०-०९-२०२०). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) येथील लक्ष्मीबाग नाल्यासमोरील घरात राहणारा पाच वर्षाचा मुलगा खेळत असताना त्याचा पाय घसरून नाल्यात पडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक ११ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाला हा पाच फूट खोल असून असुरक्षित असूनही मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागाने महानगरपालिकेच्या इमारती धोकादायक म्हणून तोडल्या व त्या ठिकाणी पालिकेच्या कर्मचाऱ्यांना आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नाला हा असुरक्षित असतानाही त्याकडे एन विभागाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले व त्याच बरोबर नाल्याच्या साफसफाईचे कंत्राट दिलेल्या कंपनीने काम न करता फक्त महानगरपालिकेचा निधी हडप केला असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच नाल्याच्या साफसफाईचे कंत्राट दिलेल्या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर नाला हा मोठा नाला असून, तो पाच फुटांपेक्षा खोल आहे. तसेच सदर नाल्याच्या बाजूस नाला रुंदीकरण प्रकल्पात धोकादायक इमारती अस्तित्वात नसून, झोपडया अस्तित्वात आहेत व सदर नाल्याच्या रुंदीकरणात बाधित होत असलेल्या काही झोपड्यांचे निष्कासन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

(३) सदर नाल्याकडे दुर्लक्ष केल्याची बाब खरी नसून, सदर नाल्याच्या रुंदीकरणाचे व संरक्षक भिंत बांधण्याचे काम बहुतांशी पूर्ण झाले आहे.

तसेच, सदर नाल्याच्या पावसाळ्यापूर्वी करावयाच्या साफसफाईचे पहिल्या टप्प्यातील काम समाधानकारकरित्या पूर्ण करण्यात आले असून, उर्वरित टप्प्यातील काम प्रगतीपथावर आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) सदर नाल्याच्या साफसफाईचे काम समाधानकाररित्या करण्यात आल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारावर महानगरपालिकेमार्फत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

मुंबई शहरात महानगरपालिकेची कामे अल्पवयीन कामगार करित असल्याबाबत

(३८) १४३६२ (२०-०९-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात महानगरपालिकेची नालेसफाईची कामे सुरु असताना अंधेरीमध्ये या कामासाठी अल्पवयीन कामगार काम करत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अल्पवयीन कामगारांना स्वसंरक्षणाची कोणतीही साधने दिली गेली नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या नाल्याची सफाई जेसीबी तसेच इतर यंत्रांच्या सहाय्याने होत असताना ती न वापरण्याची नेमकी काय कारणे आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कामगारांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१) अंधेरी (पूर्व) येथील कृष्णानगर नाल्यावर अल्पवयीन कामगार काम करीत असल्याची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस माहे मे, २०२० मध्ये प्राप्त झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) मोठ्या नाल्यांची सफाई करतेवेळी जेथे शक्य आहे तेथे यंत्राद्वारेच सफाई करण्यात येते व जेथे शक्य नीही तेथे मनुष्यबळाचा वापर करण्यात येतो.

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

तथापि, सदर प्रकरणी सत्यता पडताळणीसाठी संबंधित कंत्राटदाराला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असता, सदर कंत्राटदाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करतांना, सदर नाल्याच्या ठिकाणी कोणत्याही अल्पवयीन /बालकामगाराची नियुक्ती करण्यात आली नसल्याचे आढळून आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या अंधेरी (पश्चिम) येथील कुपर रुग्णालयामधील वैद्यकिय अधिकारी यांनी कोविड-१९चा मृत्यु दाखला देण्याकरीता लाच मागितल्याबाबत

(३९) १४४५७ (२०-०९-२०२०). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या अंधेरी (पश्चिम) येथील कुपर रुग्णालयामधील वैद्यकिय अधिकारी डॉ. निरंजन क्षीरसागर यांनी कोविड-१९चा मृत्यु दाखला देण्याकरीता रु. १० हजाराची लाच मागितली असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हृदयविकाराने मृत्यु झालेल्या रुग्णाला कोविड-१९ ने मृत्यु झाल्याचा दाखला देण्याकरीता रु. १० हजार मागितले परंतु रु. ७००० घेवून अन्य डॉक्टरकडे त्यांना मृत्युचा दाखला घेण्याकरीता पाठविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीअंती सदर दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२१) : (१) व २) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व्ही.एन. देसाई रुग्णालयाच्या आस्थापनेवर नियुक्त व कुपर रुग्णालय येथे कामगिरी तत्वावर कार्यरत असलेले सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. निरंजन क्षीरसागर यांनी दिनांक १९.०४.२०२० रोजी एका रुग्णाच्या नातेवाईकाकडून मृत्यूच्या कारणाचे प्रमाणपत्र देण्यासाठी रु. १० हजाराची लाच मागितली व रु. ७ हजार घेऊन मृत्यूचे प्रमाणपत्र दिल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी सकृतदर्शनी तथ्य आढळून आल्याने डॉ. निरंजन क्षीरसागर यांचेविरुध्द खातेनिहाय चौकशीची कार्यवाही सुरु असून, त्यांना दिनांक २१.०४.२०२० पासून निलंबित करण्यात आले होते.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ०२.०५.२०२० रोजीच्या परिपत्रकात, लाचलुचपत, फौजदारी आणि अन्य प्रकरणी निलंबित असलेल्या कर्मचारी/अधिकाऱ्यांचे निलंबन तात्पुरते खंडीत करुन त्यांना तात्पुरत्या स्वरुपात पुन:स्थापित करुन कोविड-१९ संबंधित कामे तत्संबंधित अतिरिक्त कामकाजासाठी नियुक्त करावे असे नमूद केले आहे.

सदर परिपत्रकानुसार डॉ. क्षीरसागर यांना फक्त कोविड-१९ च्या प्रादुर्भाव कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात कामावर हजर करुन घेतले आहे.

गोंदिया नगरपरिषदेकडून शहरात लावण्यात आलेल्या कचरा कुंडया निकृष्ट दर्जाच्या असल्याबाबत

(४०) १४५७३ (२०-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया नगरपरिषदेकडून गतवर्षी २८ लक्ष रुपये खर्च करुन सुमारे २०० स्टिलच्या कचरा कुंडया शहरातील विविध भागात कचरा संकलनाकरीता लावण्यात आल्या व सदर कचरा कुंडया काही महिन्यात निकाम्या झाल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचऱ्याचे विगलीकरण करुन कचरा संकलन करण्याकरीता कंत्राटदाराकडून स्टिलच्या कुंडया शहरामध्ये लावण्यात आल्या त्या निकृष्ट दर्जाच्या असल्याने निकामी झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी नगरपरिषद प्रशासनाने व शासनाने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१), (२) व (३) नगरपरिषद गोंदिया स्वच्छ सर्वेक्षण २०१९ करीता केंद्र शासनाकडून प्राप्त निर्देशानुसार प्रोत्साहन अनुदानातून वाणिज्यिक क्षेत्रात ओला व सुका कचऱ्याचे विलगीकरण करण्याकरीता स्टीलच्या कुंड्या बसविणेबाबत नगरपरिषदेच्या स्थायी सभेने मंजूरी प्रदान केली होती.

• त्याअनुषंगाने ई-निविदाद्वारे सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.मन्नत इंटरप्राईजेस, गोंदिया यांचेबरोबर करारनामा करुन दिनांक १५/१/२०१९, ४/२/२०१९ व दिनांक ७/३/२०१९ ला एकूण २०० स्टील कचरा कुंड्या पुरवठा करणेबाबत कार्यादेश देण्यात आलेला आहे.

• सध्या शहरात दळणवळणाच्या सोयीकरीता नवीन सिमेंट रोड व नाली बांधकाम प्रस्तावित आहेत. त्यामुळे काही प्रमाणात स्टील कुंड्या काढून नगरपालिका कार्यालयात हलविण्यात आलेल्या आहेत. प्रस्तावित कामे पूर्ण होताच स्टील कुंड्या नियोजित स्थळी बसविण्यात येतील, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा-या इमारतीतील बेकायदा रहिवाशांवर कारवाई करण्याबाबत

(४१) १४७०० (१७-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या इमारतीमधील एसआरए (बेकायदा) रहिवाशांची चौकशी केली जाणार असून त्यासाठी शासन गृहनिर्माण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीचे गठन करण्यात आले आहे काय, उक्त समितीद्वारे आतापर्यंत किती

बेकायदेशीर रहिवाशांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (३१-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी शासन निर्णय गृहनिर्माण विभाग दि.०९.०१.२०१७ अन्वये मा. मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची समिती गठीत करण्यात आली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील इमारतीमध्ये बेकायदेशीरपणे राहणाऱ्यांची एकूण १३५६४ प्रकरणे सक्षम प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेली आहेत. मा.उच्च न्यायालय यांचेकडील रिट याचिका क्र.०२/२०२० मध्ये दि.१५.०७.२०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार दि.३१.०८.२०२० पर्यंत ३ ई च्या कारवाईस स्थगिती देण्यात आली असून दि.३०.०९.२०२० च्या आदेशानुसार सदर स्थगितीस दि.३१.१०.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानंतर पुन:श्च मा.उच्च न्यायालयाने दि.२९.१०.२०२० रोजीच्या आदेशानुसार ३ ई च्या कारवाईच्या स्थगितीस दि.२२.१२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये बेकायदेशीरपणे राहणाऱ्यांवर ३ई नुसार कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विक्रोळी पूर्व (मुंबई) परिसरातील ५० पेक्षा जास्त म्हाडाच्या इमारतींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत

(४२) १४८४० (१९-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी पूर्व (मुंबई) परिसरातील दुतगती महामार्गाला लागून ५० पेक्षा जास्त म्हाडाच्या इमारती आहेत, तांत्रिक नियमामुळे एमएमआरडीए आणि पीडब्ल्यूडी या इमारतींना ना हरकत प्रमाणपत्र देत नसल्यामुळे या इमारतींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्व द्रुतगती मार्गाच्या जवळ असलेल्या कन्नमवर नगरामध्ये ३० तर महामार्गाला लागून २५ पेक्षा जास्त इमारती पुनर्विकास यापूर्वीच झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या या इमारतींची प्रचंड दुरवस्था झाली असून येथील रहिवाश्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे तसेच ३ ते ४ इमारतींचा पुनर्विकास झाला बाकी इमारतींना पुनर्विकासाची परवानगी मिळाली नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (२२-१२-२०२०) :(१), (२), (३) कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई येथील पुर्व द्रुतगती महामार्गाला लागून म्हाडाच्या एकूण ३५ इमारती असून त्यापैकी २ इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.तसेच त्यासोबत आणखी एका इमारतीला ना हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही म्हाडा मार्फत चालू आहे.

तसेच टागोर नगर, विक्रोळी (पुर्व) येथील पुर्व द्रुतगती महामार्गाला लागून म्हाडाच्या एकूण २६ इमारती असून त्यापैकी १६ इमारतीच्या पुनर्विकासाचे काम प्रगतीपथावर आहे.

पथकिनारवर्ती नियमात एकसुत्रता आणण्याच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या नगर विकास विभागाच्या दि.०५.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये द्रुतगर्ती महामार्गाला लागून असलेल्या इमारतींना सद्यस्थितीत तांत्रिक मंजुरीकरीता एम.एम.आर.डी.ए. व पी.डब्ल्यु.डी. या विभागांकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक नाही.

सबब, म्हाडाच्या कन्नमवार नगर व टागोर नगर येथील पुर्व द्रुतगती महामार्गाला लागून असलेल्या इमारतींना गृहनिर्माण संस्थांकडून पुनर्विकासाचे प्रस्ताव म्हाडास प्राप्त झाल्यास उक्त दि.०५.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर संस्थाना पुनर्विकासाकरीता म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र देणे सोयीस्कर झालेले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

आर्वी (जि. वर्धा) येथे हायब्रीट ॲन्युईटी अंतर्गत रोहणा-वाढोणा-कारंजा तसेच खरांगणा-मासोद-कोंढाळी रस्त्याचे काम अत्यंत व निकृष्ठ दर्जाचे होत असल्याबाबत

(४३) १४८४४ (१९-०९-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी विधानसभा मतदार संघातील रामा क्र. ३२३ रोहणा-वाढोणा-कारंजा रस्ता कि.मी. ०/०० ते २८/५०० किंमत ८७.२६ कोटी रूपये व रामा.क्र. ३२४ खरांगणा-मासोद-कोंढाळी रस्ता कि.मी. ०/०० ते ३५/८०० किंमत ७२.५४ कोटी रूपये सन २०१८ मध्ये शासनाने मंजुर केले असून या रस्त्यांचे कामकाज २ वर्षापासून सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने रस्त्याच्या दोन्ही बाजु व पुलाचे खोदकाम करून ठेवलेले असल्यामुळे अनेक नागरिकांचे अपघात व शेतकऱ्यांची जनावरे खड्ड्यात पडून त्यांचा मृत्यु होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत सहा महिन्यापासून या रस्त्याचे व पुलाचे बांधकाम पुर्णत: बंद पडलेले असुन सद्यस्थितीत संपुर्ण रस्त्याचे फक्त १५ टक्केच काम झालेले आहे, तसेच कंत्राटदाराची मुदतही माहे डिसेंबर, २०२० पर्यंत संपत असून हे काम विहीत कालावधीत पुर्ण होणे शक्य नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार विहीत मुदतीत काम पुर्ण न करु शकणा-या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (१६-१२-२०२०) : (१) होय. (२) नाही.

या रस्ते लांबीत येत असलेल्या विविध पोलीस स्टेशनकडून अहवाल मागितला असता,

सदर खोदकामामुळे असे कुठल्याही प्रकारचे अपघात झाल्याचे पोलीस स्टेशन, आर्वी कोंढळी, पुलगांव, खरांगणा,कारंजा (घा.) पोलीस निरीक्षक यांचे अहवालावरुन दिसून येत नाही. सदर प्राप्त अहवालात दोन व्यक्ती मृत्यू पावल्याची नोंद ही पोलीस स्टेशन, कोंढाळी व कारंजा (घा.) यांचे अहवालावरुन निदर्शनास येते. तसेच पाच व्यक्ती जखमी झाल्याची नोंद कारंजा पोलीस स्टेशनच्या अहवालावरुन दिसून येते. परंतु झालेल्या अपघाताचे ठिकाण हे वनपरिक्षेत्रात येत असल्याने येथे सध्या,सार्वजनिक बांधकाम मंडळ,चंद्रपूर अंतर्गत कुठल्याही प्रकारचे काम सुरु नाही. तसेच शेतकऱ्यांची जनावरे खड्डयात पडून मृत्यू झाल्याचे बाबीबद्दल चौकशीअंती तालुका पशु वैद्यकीय अधिकारी यांच्या मौखीक सूचनेनुसार "निरंक" असल्याचे कळविले आहे.

(३) सद्य:स्थितीत, करारनाम्यातील ४०% काम पूर्ण झाले आहे.सदर रस्त्याच्या एकूण ७५.३० किमी लांबीपैकी ३०.४० कि.मी. लांबी वनक्षेत्रातून जाते. वन विभागाच्या परवानगी अभावी कामे रेंगाळलेली आहेत. तसेच कोविड-१९ या संसर्गजन्य महामारीमुळे मजूरा अभावी कामे संथ गतीने सुरु असून, शासन निर्णय दिनांक २९/७/२०२० नुसार १८० दिवस मुदतवाढ प्रस्तावित आहे.सन मे, २०२१ पर्यंत सदर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) कामाची गती वाढविणेबाबत उद्योजकास कामाच्या जागेवर प्रत्यक्षपणे कार्यकारी अभियंता तसेच सार्वजनिक बांधकाम मंडळ यांच्या स्तरावरुन वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) वन विभागाच्या परवानगी अभावी तसेच कोविड-१९ संसर्गजन्य साथीमुळे काम करण्यास अडचण निर्माण होत आहे.

राज्यातील इमारती कोसळून झालेल्या दुर्घटनांबाबत

(४४) १४८८८ (१३-११-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रामधील धामणकर नाका परिसरातील पटेल कंपाऊंडमधील जिलानी इमारत दिनांक २१ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास कोसळून सुमारे ४० हून अधिक नागरिकांचा बळी गेला असून या संदर्भातील अहवाल शासनाला दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास सादर करण्यात आला असून सदर अहवालानूसार सन १९७५ मध्ये ग्रामपंचायत अस्तित्वात असतानाही इमारत विनापरवाना बांधण्यात येऊन या इमारतीमध्ये झालेल्या बदलांबाबत व इमारतीस सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी इमारतीचे मालक व भोगवटा धारकांवर होती मात्र तशी कोणतीही खबरदारी घेण्यात आली नव्हती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून देखील निष्काळजीपणा झाला असून शासन आदेशानुसार माहे मार्च-एप्रिलमध्ये धोकादायक व अतिधोकादायक इमारतींना नोटीस देऊन त्यांची सी-१ व सी- २ अशी वर्गवारी करणे आवश्यक होते असे निष्कर्ष या समितीने काढले आहेत त्याचबरोबर समितीने भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी काही उपाययोजनाही सुचविल्या आहेत तसेच मालक, भोगवटाधारक व महानगरपालिका अधिकारी यांच्यावर गंभीर दोषारोपही ठेवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नगरसेवक यांनी चौकशी करण्याची मागणी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व आयुक्त, भिवंडी महानगरपालिका यांच्याकडे केली आहे तसेच भिवंडी शहरातील जुन्या इमारतींना वाढीव चटई निर्देशांक (एफएसआय) देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, दिनांक १६ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास मुंबईतील फोर्ट विभागातील भानुशाली इमारत तसेच मुंबई उपनगरातील मालाड-मालवणी येथील नुरी मस्जिदजवळील एक दुमजली इमारत तसेच मरोळ-अंधेरी येथील ईक्बाल मंझिल या इमारती तसेच महाड (जि. रायगड) येथील तारिक गार्डन ही ५ मजल्यांची इमारत दिनांक २४ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्या सुमारास कोसळून त्यामध्ये १६ जणांचा मृत्यू झाला होता, याचप्रकारे मुंबईतील नागपाडा येथील शुक्ला स्ट्रीट वरील आयेशा कंपाऊंडमधील मिश्रा मॅन्शन इमारतीचा भाग दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्या सुमारास कोसळून त्यामध्ये २ जणांचा तर दिनांक २ सप्टेंबर, २०२० रोजी डोंगरी (मुंबई) येथील डॉ. महेश्वरी मार्गावरील रझा चेंबर या इमारतीचा भाग कोसळून एका महिलेचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त कोसळलेल्या इमारतींच्या प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार संबंधित इमारत मालक, वास्तुविशारद (Architecture) व संबंधित प्रशासकीय अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना तसेच जखमींना शासनाने जाहिर केलेली मदत लवकरात लवकर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१) : (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार दिनांक २१.०९.२०२० रोजी पटेल कंपाउन्ड कामत घर भिवंडी येथील जिलानी इमारतीच्या पश्चिमेकडील भाग कोसळून झालेल्या दुर्घटनेत ३८ रहिवासी मृत्यूमुखी पडले आहेत.

सदर दुर्घटनेची चौकशी करण्याकरीता महानगरपालिका स्तरावर गठीत करण्यात आलेल्या ४ सदस्यीय चौकशी समितीने त्यांचा अहवाल आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना सादर केला आहे.

सदर अहवालाच्या निष्कर्षामध्ये दुर्घटनाग्रस्त इमारतीचे बांधकाम सन १९७५ मध्ये झाले असून बांधकाम परवानगी बाबत कोणतेही कागदपत्र आढळून येत नसल्याने सदर इमारत अनाधिकृतपणे बांधल्याचे नमूद केले आहे. तसेच महाराष्ट्र नगर रचना अधिनियमातील तरतूदी नुसार इमारत सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी मालक/ भोगवटदार यांची आहे.

(२) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका स्तरावर गठीत ४ सदस्यीय कमिटीने दुर्घटनेच्या चौकशीअंती काढलेल्या निष्कर्षामध्ये असे नमूद केले आहे की, दुर्घटनाग्रस्त इमारतीचा समावेश शासनाच्या दिनांक ५.११.२०१५ च्या मार्गदर्शक सूचना नुसार सी-१ / सी-२ ए (अतिधोकादायक/इमारत रिकामी करुन संरचनात्मक दुरुस्ती करणे) या प्रवर्गात तत्कालीन अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेला नाही.

तसेच इमारत दुर्घटनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी यांनी जबाबदारी पार पाडताना केलेली दिरंगाई व इमारतीचे मालक /भोगवटादार यांची जबाबदारी याविषयी भाष्य करुन भविष्यात अशा प्रकारे दुर्घटना घडू नये यासाठी विविध उपाययोजना देखील शिफारशीत केल्या आहेत.

(३) दिनांक २१.०९.२०२० रोजी भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीत झालेल्या जिलानी बिल्डिंग दुर्घटनेच्या अनुषंगाने तात्काळ चौकशी करण्याचे व भिवंडी शहरातील जुन्या व जीर्ण इमारतीच्या पुनर्विकासाकरीता FSI देण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी निवेदन सादर केले असल्याची वस्तुस्थिती आहे.

(४) महाड, जि. रायगड येथिल तारीक गार्डन या पाच मजली इमारत दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला आहे.

बृहनमुंबई महानगरपालिकेने इमारत दुर्घटनेबाबत खालील वस्तुस्थिती कळविली आहे.

- मुंबई उपनगरातील मालाड-मालवणी येथील नुरी मस्जीदजवळील एक दुमजली धोकादायक बांधकामावरील काही भाग कोसळला होता. सदर दुर्घटनेत ०२ जणांचा मृत्यू झाला आहे.
- बृहनमुंबई महानगरपालिकेने दिनांक १७.०७.२०२० रोजी सदरचे बांधकाम उपजिल्हाधिकारी यांच्या अखत्यारित असल्याचे त्यांना कळविले आहे. तसेच उर्वरीत बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे.
- तसेच के/पुर्व विभागात मरोळ अंधेरी येथे इक्बाल मंझिल अशा नावाची इमारत दुर्घटनाग्रस्त झाल्याची बाब सत्य नाही.
- दिनांक १६.०७.२०२० रोजी फोर्ट येथील भानुशाली इमारत कोसळून १० रहिवाशांचा मृत्यु झाला आहे.
- तसेच दिनांक ०२.०९.२०२० रोजी डोंगरी, मुंबई येथील डॉ.महेश्वरी मार्गावरील रझ्झाक चेंबर या उपकर प्राप्त (म्हाडाच्या) इमारतीच्या भाग कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला आहे.
- दिनांक २८.०८.२०२० रोजी नागपाडा, मुंबई येथील शुक्लाजी स्ट्रीटवरील आयेशा कंपाऊंड मधील मिश्रा मेन्शन इमारतीचा भाग कोसळून त्यामध्ये २ जणांचा मृत्यु झाला आहे.

(५) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील जिलानी इमारत दुर्घटनेच्या अनुषंगाने संबंधित सहाय्यक आयुक्त व शहानिशा अधिकारी यांना निलंबित केले असून सदर घर मालक यांच्यावर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाड येथील तारीक गार्डन इमारत दुर्घटना प्रकरणी जागा मालक, विकासक, वास्तुविशारद, तत्कालीन मुख्य अधिकारी व संबंधित इंजिनियर या सर्वांवर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान दुर्घटनेमध्ये मृत व्यक्तींच्या वारसांना व जखमींना मदत देण्याची कार्यवाही

करण्यात आली आहे, असे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका व महाड नगरपरिषद यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीच्या पुनर्विकास योजनेबाबत

(४५) १४९२४ (२७-११-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीच्या पुनर्विकास योजनेत तेथे वास्तव्यास असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना माफक दरात मालकी हक्काची घरे देण्यासंबंधी आमदारांची समिती गठीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतचे निकष ठरविण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या आमदारांच्या समितीने आपला अहवाल दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास तत्कालीन राज्य शासनाला सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाबाबत शासनाकडून मागील अनेक महिन्यांपासून कोणतीच कार्यवाही न झाल्याने सदर प्रकल्प रखडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्प प्रभावीपणे राबवून तेथे वास्तव्यास असलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना माफक दरात घरे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (११-०१-२०२१) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथिल गोरेगाव-मुलुंड या जोड रस्त्याचे काम जलदगतीने करण्याबाबत

(४६) १६४७२ (२५-११-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील वाहतूक कोंडी समस्या सोडविण्यासाठी पश्चिम द्रुतगती महामार्गाला पर्याय ठरणारा पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा गोरेगाव मुलुंड लींक रोड (जी.एम.एम.आर.) च्या प्रस्तावित उड्डाणपुलाचे व रस्ता रुंदीकरणाचे प्रलंबित विकासकाम लवकरात लवकर करणेबाबत लोकप्रतिनिधींनी माननीय मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गोरेगाव मुलुंड लींक रोड रस्त्याच्या विकास कामासाठी मुंबई महानगरपालिकेने निधी मंजूर करण्यात येऊनही अद्याप सदरहू विकासकाम सुरू न करण्याची व त्यास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकल्पात किती वंचित कुटुंब आहेत व त्यांची पर्यायी व्यवस्थेबाबत शासनाने काय नियोजन केलेले आहे,

(४) असल्यास, तसेच सदर विकास काम सुरू करून निश्चित कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) गोरेगांव-मुलुंड लिंक रोड प्रकल्पाच्या कामास सन २०१७ पासून सुरुवात झाली असून, गोरेगांव बाजूच्या पश्चिम द्रुतगती मार्ग ते फिल्मसिटीचे प्रवेशद्वार व तानसा पाईपलाईन पूल ते पूर्व द्रुतगती मार्ग येथील रस्त्याच्या विकास आराखड्यानुसार ४५.७० मी. रुंदीकरण व नाहुर रेल्वे स्थानक येथील रेल्वेवरील उड्डाणपुलाचे रुंदीकरण ही कामे प्रगतीपथावर आहेत.

उर्वरित कामाच्या निविदांचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) सदर प्रकल्पामुळे अंदाजे ७०७ कुटुंबे बाधित होणार असून, त्यांचे पुनर्वसन विभाग स्तरावर उपलब्ध प्रकल्पग्रस्त सदनिकांमध्ये तसेच खिंडीपाडा येथील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन भांडुप येथे करण्याचे नियोजित आहे.

(४) व (५) सदर प्रकल्पाचे काम निश्चित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या अतिक्रमित शासकीय जमिनीच्या हस्तांतरणाबाबतची व वन अधिनियमानुसार केंद्रीय स्तरावरील क्षेत्रीय अधिकारीक समितीकडून लागणारी परवानगी मिळविणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

हडपसर (जि.पुणे) येथील कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाच्या कामाबाबात

(४७) १७६५५ (२१-११-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अशोक पवार (शिरुर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) येथील कात्रज-कोंढवा या रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले असून रस्त्याचे रुंदीकरणामध्ये बाधित नागरिकांना मोबदला न देता काम सुरु केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यासाठी लागणाऱ्या जागेचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने वारंवार वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये बाधित नागरिकांना मोबदला देणेबाबत अद्यापही कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार या रस्त्यासाठी लागणाऱ्या जागेचे भूसंपादन लवकरात लवकर करण्याबाबत तसेच रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये बाधित नागरिकांना मोबदला देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१) : (१),(२),(३) व (४)

• पुणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील कात्रज-कोंढवा या ८४ मी. डी. पी. रस्त्याचे विकसनाचे काम सुरु आहे, हे खरे आहे.

• सदर रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित नागरिकांना एफ.एस.आय./टी.डी.आर. स्वरुपात मोबदला देण्यात येत असून, काही बाधित मिळकती प्राथमिक ताबे पावतीनुसार, संमती पत्राद्वारे ताब्यात घेण्यात आलेल्या आहेत.

• त्यानुसार एकूण १९५ मिळकत धारकांशी दैनंदीन संपर्क साधून, विनंती पत्र देऊन, संमती पत्राद्वारे जागांचा ताबा घेण्याची कार्यवाही सुरु असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• तसेच रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या मिळकतींची संयुक्त मोजणी, रेखांकनांचा खर्च, दाखल प्रकरणांचे प्रशासकीय शुल्क, हमीपत्र, शपथपत्र, बंधपत्र इत्यादी सर्व खर्च पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

• टी.डी.आर. प्रक्रीयेतील दुसऱ्या टप्प्यातील मोजणीस सवलत देण्यात येत आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• रस्ता रूंदीकरणाने बाधीत जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यास जागा मालक प्रतिसाद देत नाहीत.

• रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत अनाधिकृत बांधकामांवर कारवाई सुरू आहे.

• तसेच भूसंपादनाकरीता विविध तांत्रीक अडचणीं येत असून त्यामुळे रस्ता रूंदीकरणाचे काम काहीसे संथ गतीने सुरू आहे.

• तसेच सध्या अस्तित्वात असलेला रस्ता दैनंदिन वाहतुकीसाठी पुरेसा नसल्याने वाहतुकीची कोंडी होते हे काही अंशी खरे आहे.

• तथापि, सदर रस्ता रूंदीकरणासाठी भू-संपादनाची कार्यवाही सुरू असून रस्त्याच्या कार्यारंभ आदेशानुसार काम सुरू झाले आहे.

• तसेच सदर प्रकल्पाचे काम शत्रुंजय मंदिरचौक व टिळेकरनगर येथील मिळकतीत प्रत्यक्ष काम सुरू झाले असून ग्रेड सेपरेटरकरीता खोदाई काम, आरसीसी वॉल, १२ मी. सर्व्हिस रस्ता, केबल डक्ट, नव्याने ड्रेनेज/पावसाळी व पाण्याची लाईन टाकणे, नाला कल्व्हर्ट इत्यादी कामे प्रगतीपथावर असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• सदर प्रकल्पाकरीता भूसंपादनाचे काम तातडीने करून रस्ता रूंदीकरणाचे काम लवकरात लवकर करण्याची दक्षता घेण्याबाबत पुणे महानगरपालिकेला कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मिठी नदीचे पात्राचे रुंदीकरण, खोलीकरण करणाच्या कामाबाबत

(४८) १८२७५ (२५-११-२०२०). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिनांक २६ जुलै, २००५ च्या महापूराला कारणीभूत ठरलेल्या मिठी नदीचे पात्र रुंदीकरण, खोलीकरणाचे काम मुंबई महानगरपालिकेने हाती घेऊन १४ वर्षाचा कालावधी होऊन तसेच ६४० कोटी रुपये खर्च करुनही पूर्ण न झाल्याने मिठी नदीच्या पूराचा मुंबईला असलेला धोका कायम आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वर्षाच्या पावसाळ्यात दिनांक ४ सप्टेबर, २०२० रोजी पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने मिठी नदी काठच्या १३०० कुटूंबाना स्थलांतरित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथे पूरपरिस्थिती निर्माण झाली की येथील रहिवाश्यांना तात्पुरत्या निवाऱ्यात स्थलंतरित केले जाते तथापि कायमस्वरुपी उपाययोजना नसल्याने येथील रहिवाश्यांना जीव मुठीत धरुन रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मिठी नदी स्वच्छ, साफ आणि सुंदर करण्यासाठी नदीतील तरंगता कचरा काढण्यात येऊन त्याचा पुनर्वापर केला जाणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकल्पाकरिता किती निधीची तरतुद करण्यात आली वा येत आहे, सदर प्रकल्पास कधीपासून सुरुवात होणार आहे,

(६) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार मिठी नदीचे सुशोभिकरण करणे तसेच वारंवार निर्माण होणारा धोका टाळण्यासाठी मिठी नदीच्या पात्रात रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षण भितींचे काम व पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) : (१) मिठी नदीच्या संवर्धानासाठी दिनांक १९.०८.२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

तद्नंतर दिनांक २९.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, मिठी नदी विकास प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता मिठी नदीची दोन भागांत विभागणी करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयानुसार मिठी नदीचा फिल्टरपाडा, पवई ते सी.एस.टी. पूल, कुर्ला या दरम्यानचा ११ कि.मी. चा विकास करण्याची जबाबदारी दिनांक २९.०७.२०१५ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेवर व मिठी नदीचा सी.एस.टी. पूल, कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यानचा ६ कि.मी. विकास करण्याची जबाबदारी एमएमआरडीवर सोपविण्यात आली.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या मिठी नदीच्या कुर्ला येथील कुर्ला-कलिना पूल ते सी.एस.टी. पूल दरम्यानचा भाग वगळता उर्वरित नदीचे रुंदीकरण व खोलीकरण जवळपास पूर्ण झाले आहे.

तसेच महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मिठी नदीच्या संरक्षण भिंतीच्या एकूण २१.५८८ कि.मी. लांबीपैकी १६.४९ कि.मी. लांबीच्या संरक्षण भिंतीचे काम पूर्ण करण्यात आले असून, ०.७५ कि.मी. लांबीच्या मिठी नदीच्या कुर्ला-कलिना पूल ते सी.एस.टी. पूल, कुर्ला दरम्यानच्या पूर्व किनाऱ्यावरील संरक्षण भिंतीचे रुंदीकरण व खोलीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ३.३२५ कि.मी. लांबीच्या संरक्षक भिंतीचे काम पॅकेज-२ अंतर्गत करण्यात येणार असून, सदर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

सन २०१९ मध्ये मिठी नदीच्या सी.एस.टी. पूल, कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यानच्या एम.एम.आर.डी.ए. च्या अखत्यारीतील उर्वरित ०.९ कि.मी. व वाकोला नदीच्या २.८ कि.मी. लांबीची संरक्षण भिंत बांधण्याचे काम पॅकेज-३ मध्ये अंतर्भूत केलेले असून, सदर कामांची अंदाजपत्रके व मसुदा निविदा पडताळणीचे काम प्रगतीपथावर आहे.

मिठी नदीच्या विकास कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आजतागायत रु. ६४० कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

(२) व (३) ज्यावेळी समुद्राला भरती असते व अतिवृष्टी होते तसेच, पवई व विहार तलाव दुथडी भरुन वाहतात, त्यावेळी विमान पतन प्राधिकरणाची भिंत आणि मिठी नदीचे पात्र यांच्या शेजारी वसलेला भूभाग सखल असल्यामुळे क्रांतीनगरमधील बाधीत लोकांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तात्पुरत्या स्वरुपात नजीकच्या महापालिका शाळांमध्ये स्थलांतरीत करण्यात येते व त्यांना भोजन, पाणी व वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येतात.

(४) व (५) मिठी नदीतील गाळ व तरंगता कचरा काढून क्षेपणभूमीवर विल्हेवाट लावण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दरवर्षी करण्यात येते.

तथापि, नदीतील कचरा काढून त्याचा पुनर्वापर करण्याचा कोणताही प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विचाराधीन नाही.

(६) व (७) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०१९ मध्ये मिठी नदीची समस्या दूर करण्यासाठी व मिठी नदीची जैवविविधता व पर्यटनवृध्दीसाठी "मिठी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प" हाती घेण्यात आला आहे.

सदर प्रकल्पांतर्गत मिठी नदीची वहन व धारण क्षमता वाढविण्यासाठी मिठी नदीचे अधिक खोलीकरण करणे, जपानी तंत्रज्ञानावर आधारित बोगदा बांधणे, मिठी नदी लगत कृत्रिम तलाव व पाणथळ तयार करणे, मिठी नदीला बारामाही वाहते करणे, माहिम खाडीजवळ किंवा इतर व्यवहार्य ठिकाणी धरण किंवा बंधारे बांधून उदंचन पंप बसविणे इत्यादी गोष्टींची व्यवहार्यता तपासण्याच्या कामांचा अंतर्भाव आहे. सदर कामांकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

मिठी नदीवर पावसाळया दरम्यान साठणाऱ्या पाण्याचा योग्य प्रकारे निचरा होण्यासाठी मिठी नदीवरील विविध पुलांचे रुंदीकरण करणे गरजेचे होते. त्यानुसार पूल विभागामार्फत खालील पुलांची कामे हाती घेण्यात आली आहेत:-

- अशोक नगर, बामनदया पाडा व क्रांती नगर, कुर्ला (पश्चिम) येथील ३ पुलांची कामे पूर्ण झाली असून, सदर पूल वाहतुकीकरिता खुले करण्यात आले आहेत.
- वाकोला पाईपलाईन व सी.एस.टी. रोड कुर्ला (पश्चिम) येथील पुलांची कामे मुंबई महानगर

प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहेत.

• ड्राईव्ह इन थिएटर येथील पुलाचे काम प्रगतीपथावर आहे, तसेच कुर्ला कालिना रोड येथील पुलाच्या बांधणीच्या दुसऱ्या टप्प्याचे काम प्रगतीपथावर आहे.

• माहिम कॉजवे, तानसा पाईप लाईन व वैतरणा पाईप लाईन येथील ३ पुलांच्या कामाकरिता कार्यादेश देण्यात आले आहेत. तथापि, सदर भाग कांदळवन क्षेत्राने बाधित असल्याने कांदळवन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर, सदर पुलांचे काम तातडीने सुरु करण्यात येणार आहे.

नाशिक येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील हायब्रीड अन्युईटी अंतर्गत मंजूर रस्त्यांच्या कामामध्ये अनियमितता झाल्याबाबत

(४९) १९६४२ (२१-११-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) वगळून मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक अंतर्गत नाशिक जिल्ह्यामध्ये हायब्रीड ॲन्युईटी मॉडेलनुसार एकूण ५ रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आलेली असून या रस्ते कामामध्ये अनेक बाबींमध्ये अनियमितता तसेच रस्त्यांच्या कामाबाबत विविध तक्रारी असल्याने या रस्त्यांच्या कामांची चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निफाड तालुक्यातील एनएसके ५५ अ व एनएसके ५५ ब या दोन कामांचा देखील त्यामध्ये समावेश असून या दोन्ही रस्त्यांची कामे अपूर्ण व निकृष्ट दर्जाची झालेली असतांना देखील संबंधित कंत्राटदारास रस्त्याच्या कामाची देयके अदा करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये रस्त्यांच्या कामांची गुणवत्त देखील तपासली जाणार आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व दोषी आढळणा-या संबंधित कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण (०६-०१-२०२१) : (१) होय. हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचेमार्फत चौकशी सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जायका प्रकल्पातील वारजे, वडगाव खुर्द प्रकल्पाची जमीन संपादनाची कार्यवाही संथ गतीने सुरु असल्याबाबत

(५०) १९८१५ (२०-११-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड),श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जायका प्रकल्पातील वारजे, वडगाव खुर्द प्रकल्पाची जमीन संपादनाची कार्यवाही संथ गतीने सुरु असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादनासाठी आवश्यक निधी, नादुरुस्त ऑनलाईन रक्कम भरणा या कारणांमुळे भूसंपादनाच्या कार्यवाहीस विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी सल्लागाराची नेमणूक लवकरात लवकर होण्याबाबत पुणे महानगरपालिकेने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला असतांना शासनाकडून उक्त प्रकरणी पाठपुरावा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्ररकणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्याअनुषंगाने जायका प्रकल्पाला गती देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१) : (१) व (२) पुणे जायका प्रकल्पातील वारजे व वडगांव खुर्द येथील प्रकल्पांकरीता अद्याप जागा ताब्यात आलेल्या नसून सदर जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• वारजे येथील जागेपैकी ५९ टक्के जागा ब्ल्यू लाईनमध्ये येत असल्याने ब्ल्यू लाईन क्षेत्र वगळून उर्वरित जागा भूसंपादन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

• वारजे येथील जागेकरीता आवश्यक रकमेचा भरणा जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे नोव्हेंबर २०१७ मध्ये जमा करण्यात आलेला आहे.

• वडगांव खुर्द येथील जागेवर विकास आरखड्यानुसार मलनि:सारण प्रकल्पाचे आरक्षण असून सदर जागेवरील अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

• त्याअनुषंगाने भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत सुरू असून आवश्यक रक्कम जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे जमा करण्यात आली असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) या योजनेसाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचलनालयामार्फत जानेवारी, २०१८ मध्ये प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून एकूण प्रकल्प किंमतीच्या ८५ टक्के एवढी रक्कम अनुदानाच्या स्वरूपात उपलब्ध होणार असल्याचे केंद्र शासनाच्या निदेशानुसार याप्रकरणी कार्यवाही केली जाते.

• अद्यापर्यंत या योजनेचे ११ पॅकेजेसमध्ये विभाजन करून स्वतंत्र निविदा मागविण्याचे नियोजन होते. मात्र केंद्र शासनाने त्याऐवजी उर्वरित सर्व पॅकेज एकत्र करून एकच निविदा मागविण्याचे निदेश दिले आहेत. त्यानुसार सुधारित प्रस्ताव केंद्रास पाठविण्यात आले असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**

मुंबई. **सचिव,**

महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.